रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ४४
www.ramprahar.com

◆ रविवार, ३० ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

महाराष्ट्रात पहिला अंतराळ संशोधन मेळावा/२
ताम्हिणी घाट ठरतोय गुन्ह्यांचा हॉटस्पॉट/५
नीरज चोप्रा आशियाई स्पर्धेतून बाहेर/८

## उद्या प्रसिद्ध होणार प्रारूप मतदार यादी



**मुंबई :** मतदार याद्याच्या शुद्धिकरणासाठी विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम राबविण्यात आली असून सोमवारी (दि. ३१) प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. या प्रारूप यादीत आपले नाव आहे की नाही याची माहिती आयोगाने दिलेल्या वेबसाइटवर बघता येणार आहे. ceo.maharashtra.gov.in, voters.eci.gov.in यावर मतदारांना आपले नाव शोधता येणार आहे. दरम्यान, प्रारूप यादी म्हणजे अंतिम यादी नाही. नाव वगळले गेले असल्यास ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत दावा करून नाव समाविष्ट करण्याची संधी आहे. जर २०२५च्या मतदार यादीत नाव होते, पण २०२६च्या प्रारूपमध्ये नाही, तर महाराष्ट्र सीईओच्या एसआयआर पोर्टलवर अशा मतदारांसाठी स्वतंत्र एएसडीडी (Absent/Shifted/Dead/Duplicate) तपासणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# सरकारकडून लाडक्या बहिणींना ओवाळणी

**मुंबई : प्रतिनिधी**

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील एक कोटी ६४ लाख ८२ हजार महिलांच्या बँक खात्यात २,४३७ कोटी रुपयांची ओवाळणी जमा केली आहे. महिला व बाल विकास विभागाने ऑगस्ट महिन्याचे अनुदान थेट लाभ हस्तांतरणाद्वारे वितरित केल्याने लाडक्या बहिणींमध्ये आनंदाचे वातावरण आहे.




राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली असून दरमहा पात्र महिलांना आर्थिक मदत दिली जाते. रक्षाबंधन सण लक्षात घेऊन ऑगस्टचा हप्ता वेळेत देण्याचे नियोजन सरकारने केले होते. त्यानुसार वितरण प्रक्रिया सुरू करून आतापर्यंत १.६४ कोटी महिलांना लाभ देण्यात आला आहे. एप्रिलअखेरच्या पडताळणीनंतर राज्यात एक कोटी ६५ लाख ५३ हजार महिला पात्र ठरल्या होत्या, तर सुमारे ९२ लाख महिला विविध निकष पूर्ण न केल्याने अपात्र ठरल्या आहेत.

### १.६४ कोटी महिलांच्या खात्यात २,४३७ कोटी रुपये जमा

पात्रतेची पडताळणी प्रक्रिया अद्याप सुरूच आहे. त्यामुळे दर महिन्याला अनुदान देताना लाभार्थी संख्येत बदल होत आहे. सातत्याने सुरू असलेल्या पडताळणीमुळे आकडेवारीत बदल होत असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे. पात्र ठरलेल्या महिलांना रक्षाबंधनाची आर्थिक ओवाळणी मिळाल्याने सणाचा आनंद द्विगुणित झाला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असून २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये थेट बँक खात्यात दिले जातात. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे, कुटुंबात चारचाकी वाहन नसणे आणि कुटुंबातील सदस्य सरकारी नोकरीत नसणे, हे प्रमुख पात्रता निकष आहेत. या योजनेसाठी आतापर्यंत सुमारे दोन कोटी ६३ लाख अर्ज प्राप्त झाले होते. महिला व बालविकास विभागाकडून आधार प्रमाणीकरण, उत्पन्न आणि बँक खात्याची पडताळणी सातत्याने सुरू आहे. योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कुंभमेळ्यावरील छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन शनिवारी (दि. २९) सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर त्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली.

रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्स आणि नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदक्षिणा हॉलमधील डॉ. सुनंदा म. गोसावी आर्ट गॅलरीत शनिवारपासून छायाचित्र प्रदर्शन सुरू झाले. ते ३० ऑगस्टपर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे. उद्घाटन सोहळ्यास जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके, आमदार सरोज अहिरे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महंत भक्ती चरणदास महाराज यांच्यासह रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्सचे अध्यक्ष अभय नेरकर, सचिव हर्षद बेळे, कार्यकारी सचिव अभिषेक व्यास, नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष सतीश काळे, सचिव प्रशांत खरोटे, सतीश देवगिरे, अशोक गवळी, नीलेश तांबे, अंबादास शिंदे, हेमंत घोरपडे, विवेक बोकील, भूषण पाटील आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते.



या प्रदर्शनात सिंहस्थ कुंभमेळ्यातील दुर्मीळ, अप्रकाशित छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. १९३२ पासूनच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ऐतिहासिक आठवणींचा अमूल्य ठेवा या छायाचित्रांमधून उलगडण्यात आला आहे.

## अग्निवीरांसाठी खूशखबर! महाराष्ट्रात मिळणार पुनर्नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदलात चार वर्षांची सेवा पूर्ण करून परतणाऱ्या अग्निवीरांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अग्निवीरांचे प्रशिक्षण, शिस्त आणि कौशल्याचा लाभ प्रशासकीय यंत्रणेला व्हावा, यासाठी गणवेशधारी गट-क संवर्गात त्यांना सामावून घेण्यात येणार आहे. यासाठी एक हजार अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.



अग्निवीरांच्या पहिल्या तुकडीची सेवा समाप्ती जवळ आल्याने त्यांना तातडीने शासकीय सेवेत घेण्यासाठी तयारी सुरू आहे. गृह विभागात पोलीस शिपाई, चालक शिपाई, कारागृह रक्षक, अग्निशामक, गृह रक्षक दलात हवालदार, तर उत्पादन शुल्क विभागात जवान, वन विभागात वनरक्षक आणि नगर विकास विभागात महानगरपालिका-नगरपालिकांमध्ये अग्निशामक पदांवर त्यांची नियुक्ती होणार आहे.

माजी अग्निवीरांना नियमितपणे सेवेत सामावून घेण्यासाठी आणि पदांचे वाटप करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समिती स्थापन करण्यात आली आहे. यात गृह, वने, सामान्य प्रशासन, वित्त, नगर विकास, विधि व न्याय विभागाचे सचिव सदस्य असतील, तर सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव (माजी सैनिक कल्याण) सदस्य सचिव असतील. ही समिती पात्रता, नियुक्ती प्रक्रिया आणि धोरण ठरवणार असून यासाठी वित्त विभागाच्या स्वतंत्र मान्यतेची गरज नसल्याने प्रक्रियेला गती मिळणार आहे.

## एफडीएकडून 'सिप्ला फार्मा'चा परवाना रद्द

**पुणे : प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुण्यातील वडकी येथील मेसर्स सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस लिमिटेड कंपनीचा औषध विक्री परवाना रद्द केला आहे. नियमांचे उल्लंघन केल्याने 'एफडीए'ने ही कारवाई केली. दरम्यान, 'एफडीए'च्या पथकाने या कंपनीच्या वडकी येथील मुख्य गोदामावर छापा टाकला, तेव्हा डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय न विकायचे औषध असलेल्या 'शेड्यूल एच' गोळ्यांच्या पॅकिंगवर 'अनाल्जेसिक व अँटीपायरेटिक' असा जाहितरावजा मजकूर छापल्याचे उघडकीस आले.

## नेपाळच्या महापुरात अडकलेले रायगडचे ३७ भाविक सुखरूप

**अलिबाग : प्रतिनिधी**

नेपाळमध्ये महापुरानंतर संपर्काबाहेर असलेले रायगड जिल्ह्यातील ३७ पर्यटक सुरक्षित असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे. अलिबाग येथील जय गिरनारी शिवदत्त मंदिर ट्रस्टच्या वतीने हा समूह नेपाळ आणि कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेला होता.

नेपाळमध्ये २६ ऑगस्ट रोजी महापूर आणि जलप्रलयामुळे मोठी जीवित व वित्तहानी झाली. या पार्श्वभूमीवर भारतातून नेपाळ-तिबेट सीमेवर गेलेल्या पर्यटकांबाबत चिंता व्यक्त होत होती. रायगडचा हा समूह संपर्क क्षेत्राबाहेर गेल्याने नातेवाईक धास्तावले होते, मात्र हा समूह पूर्णपणे सुरक्षित असून तिबेटमधील सागा येथे अडकून पडला होता. कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करून परतीच्या प्रवासात ते सागा येथे अडकले होते. नेपाळ प्रशासनाकडून त्यांना आवश्यक मदत व सहकार्य करण्यात आले.



जिल्हा प्रशासन या नागरिकांच्या सातत्याने संपर्कात असून त्यांच्या सद्यस्थितीबाबत नियमित माहिती घेत आहे. या पर्यटकांच्या परतीसाठी नेपाळ प्रशासनाच्या सहकार्याने पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या तातडीच्या पुढाकारानंतर सर्वांना खासगी बसने सागा येथून न्यालम चेक पोस्टमार्गे काठमांडूकडे आणण्यात आले. शुक्रवारी सायंकाळी ते काठमांडू येथे दाखल झाले असून लवकरच विमानाने मायदेशी परतणार असल्याची माहिती आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी सांगितले की, सर्व ३७ नागरिक पूर्णपणे सुरक्षित असून त्यांना सुरक्षितपणे रायगड येथे परत आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अलिबाग येथील नातेवाइकांशीही प्रशासनाचा संपर्क असून समन्वय व देखरेख सुरू आहे.

## निवडक

### राहुल गांधींच्या मनुस्मृतीवरील वक्तव्यावरून वाद; तक्रार दाखल

**नवी दिल्ली :** मनुस्मृतीसंदर्भात काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केलेल्या टिप्पणीवरून भाजप नेत्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या वकील नाझिया खान यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात गाझियाबाद पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येकाला असले तरी राहुल गांधी यांनी केलेली टिप्पणी आक्षेपार्ह असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच राज्यात वाढणार पावसाचा जोर

**मुंबई :** महाराष्ट्रात मान्सून अपेक्षेप्रमाणे बरसला नसताना सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ४ आणि ५ सप्टेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, विदर्भ व उत्तर मराठवाड्याच्या काही भागांत पावसाचे प्रमाण वाढण्याचा अंदाज आहे, मात्र त्यानंतर पुन्हा स्थिती कमकुवत होण्याची शक्यता आहे. १० ते २४ सप्टेंबरदरम्यान सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे.

## पनवेलमध्ये महापौर चषक मान्सून क्रिकेट स्पर्धा






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सोसायटी क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महापौर चषक मान्सून ब्लास्टर रबर बॉल क्रिकेट स्पर्धा २०२६ला क्रिकेटप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. पनवेल येथील मिडलक्लास को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

### नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

यावेळी महापौर नितीन पाटील यांच्यासह सभापती अजय बहिरा, उद्योजक राजू गुप्ते, राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक शिवदास कांबळे, नगरसेवक सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, राजू सोनी, समीर ठाकूर, माजी नगरसेवक अरविंद सावळेकर, सुनील बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जार्ज, रूपेश नागवेकर, सतीश पाटील, पवन सोनी आदी उपस्थित होते.

दरम्यान, स्पर्धेत सहभागी झालेल्या संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. मान्सूनच्या वातावरणात रंगलेल्या या स्पर्धेमुळे परिसरात क्रीडामय उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी खेळाडूंना शुभेच्छा देत युवकांनी क्रीडा क्षेत्रात अधिकाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. क्रिकेटप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत स्पर्धेची सुरुवात झाली असून आगामी सामने अधिक रंगतदार होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## शिक्षणतज्ज्ञ डॉ. श्रीपाद ढेकणे यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**

विद्यार्थी चळवळ, अध्यापन आणि राज्याच्या शिक्षण धोरणात मोलाची भूमिका बजावणारे डॉ. श्रीपाद ढेकणे (६२) यांचे शनिवारी (दि. २९) अल्पशा आजाराने निधन झाले. १९८३ पासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून त्यांनी पुणे ग्रामीण, सोलापूर, शिवाजी विद्यापीठ, कोकण आणि गोवा भागात संघटनमंत्री म्हणून काम केले. नंतर ते खडकी येथील टी. जे. महाविद्यालयात प्राध्यापक झाले.



त्यांनी महापालिकांच्या अंदाजपत्रकांवर पीएचडी केली. शिक्षणमंत्री विनोद तावडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात विशेष अधिकारी म्हणून त्यांनी विद्यापीठ कायदा बदल, खासगी विद्यापीठ कायदा आणि राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीत महत्त्वाचे योगदान दिले. भाजपचे पुणे शहर प्रवक्ते म्हणूनही त्यांनी काम पाहिले. लोकसभा, विधानसभा व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकांमध्ये त्यांनी विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या.

## मानिवलीच्या निसर्गा गवळीला आइस स्टॉक स्पर्धेत कांस्यपदक

**नेरळ : प्रतिनिधी**

क्रांतिवीरांच्या शौर्याने ओळखल्या जाणाऱ्या कर्जत तालुक्यातील मानिवली गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. गावातील कन्या निसर्गा दिलीप गवळी हिने ऑस्ट्रिया-जर्मनी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आइस स्टॉक चॅम्पियनशिप स्पर्धेत कांस्यपदक जिंकत भारताचा तिरंगा सातासमुद्रापार अभिमानाने फडकावला आहे.

यादवराव तासगावकर पॉलिटेक्निकच्या संगणक अभियांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी असलेल्या निसर्गाने इंडिव्हिज्युअल टार्गेट प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत जगात सातवा क्रमांक पटकावला. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत ऑस्ट्रिया, जर्मनी, फ्रान्स, कॅनडा यांसह १५ देशांतील सुमारे ५०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. आइस स्टॉक हा जगातील सर्वात आव्हानात्मक क्रीडाप्रकारांपैकी एक मानला जातो. उणे तापमानात गोठलेल्या बर्फावर उभे राहून प्रत्येक फेक अचूक लक्ष्यावर पोहोचवावी लागते.




घसरडा पृष्ठभाग, कडाक्याची थंडी आणि मानसिक स्थैर्य या तिहेरी कसोटीवर मात करत निसर्गाने भारतासाठी कांस्यपदक मिळवले. निसर्गाला सुरुवातीला बॉक्सिंगची आवड होती. सातवीत असतानाच तिने क्रीडा क्षेत्रात प्रवेश केला. तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांमधून पुढे जात तिने राष्ट्रीय स्तरावर रायगडचे प्रतिनिधित्व केले. रशिया आणि गोवा येथे सुवर्णपदके जिंकत तिने आपली क्षमता सिद्ध केली. जम्मू-काश्मीर (२०२३), कोल्हापूर, पुणे आणि नवी मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्येही तिची कामगिरी उल्लेखनीय ठरली.

निसर्गाच्या यशामागे प्रशिक्षकांचे मोलाचे योगदान आहे. सुरुवातीला स्वप्नील अडुळकर यांनी पायाभरणी केली, त्यानंतर संस्कृती घरत, महेश राठोड आणि इरफान सर यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. निसर्गाचे वडील दिलीप गवळी हे उत्कृष्ट कबड्डीपटू असून आई रुपाली गवळी यांनी खो-खोमध्ये प्रावीण्य मिळवले आहे. मुलीच्या स्वप्नासाठी दोघांनीही आर्थिक, मानसिक आणि नैतिक पाठबळ दिले. या यशाबद्दल तासगावकर समूहाचे चेअरमन डॉ. नंदकुमार तासगावकर यांनी निसर्गाचा सत्कार केला. प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी आणि मानिवली ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले आहे.

## ममता बॅनर्जींवर गुन्हा दाखल

**कोलकाता : वृत्तसंस्था**

तृणमूल काँग्रेसच्या वर्धापन दिन सोहळ्यादरम्यान कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप करत पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व आयोजकांविरोधात कोलकाता पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचा भंग झाल्याचे सांगत पोलिसांनी ही कारवाई केली आहे. कोलकाता येथील हॅस्टिंग्स पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ ऑगस्ट रोजी तृणमूल काँग्रेसच्या विद्यार्थी आघाडीचा वर्धापन दिन सोहळा कोलकाता येथील कॅथेड्रल रोड येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी कोलकाता उच्च न्यायालयाने काही महत्त्वाच्या अटींसह परवानगी दिली होती.

## ई-स्पोर्ट्स गेम्स फेडरेशनच्या अध्यक्षपदी आशिष शेलार

### तरुणांसाठी नव्या संधींची ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

ई-स्पोर्ट्स गेम्स फेडरेशनच्या अध्यक्षपदाची धुरा माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी स्वीकारली असून, ई-स्पोर्ट्स क्षेत्राला शिस्तबद्ध आणि व्यावसायिक स्वरूप देऊन तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. देशातील २२ राज्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या फेडरेशनच्या सर्वसाधारण बैठकीत शेलार यांची निवड करण्यात आली.

माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार म्हणाले की, ई-स्पोर्ट्स क्षेत्राला अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि व्यावसायिक स्वरूप मिळावे, त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होऊ शकेल व देशात रोजगार उपलब्ध होऊ शकेल. युवा पिढीतील डिजिटल कौशल्यांना व्यासपीठ देतानाच ई-स्पोर्ट्सला केवळ मनोरंजन किंवा गेमिंग न मानता कौशल्य, शिस्त, प्रशिक्षण आणि करिअरची संधी असलेले क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे आव्हान स्वीकारून तरुणांसाठी काम करू.



मैदानी खेळाप्रमाणे ई-स्पोर्ट्समध्येही प्रावीण्य असलेले खेळाडू तयार करू. त्यासाठी विविध राज्यांच्या फेडरेशनशी समन्वय साधून केंद्र सरकारशी आवश्यक तो संवाद साधू, असेही नवनियुक्त अध्यक्ष शेलार यांनी सांगितले. ईएसजीएफ ही देशातील ई-स्पोर्ट्सच्या विकासासाठी कार्यरत महत्त्वाची संस्था असून या क्षेत्रात झपाट्याने होणारी वाढ पाहता यातील नव्या संधी तरुणांना उपलब्ध करून देण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. देशात ई-स्पोर्ट्स आणि गेमिंग क्षेत्राचा विस्तार प्रचंड वेगाने होत आहे. भारतात सुमारे ५२ कोटी गेमर्स असून, दररोज ११ कोटी खेळाडू खेळतात. देशात २८ या खेळांच्या टूर्नामेंट होतात. हे गेम पाहणाऱ्यांची संख्या सुमारे ८ ते ९ कोटी आहे.

# ४० लाखांची लाच घेताना अतिरिक्त आयुक्तांसह जीएसटी अधिकारी सीबीआयच्या जाळ्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दगड खाणी व्यवसायाशी संबंधित कर आणि रॉयल्टीचे प्रकरण निकाली काढण्यासाठी तब्बल एक कोटी ५० लाख रुपयांची लाच मागून ४० लाख रुपयांचा सौदा निश्चित करणाऱ्या केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांसह खासगी मध्यस्थाला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) बेड्या ठोकल्या आहेत.



तक्रारदाराकडून ४० लाख रुपयांची लाच स्वीकारताना खासगी मध्यस्थाला रंगेहाथ पकडल्यानंतर सीबीआयने या प्रकरणाचे सूत्र थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत नेले. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त विनय कुमार कांठेती, अधीक्षक राकेश कुमार सिन्हा आणि खासगी मध्यस्थ नरेंद्र राजपूत या तिघांना अटक करण्यात आली.सीबीआयने या प्रकरणात २६ ऑगस्ट रोजी केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागातील अधीक्षकाविरोधात गुन्हा दाखल केला होता. तक्रारदाराच्या दगड उत्खनन व्यवसायाशी संबंधित कर आणि रॉयल्टीचे प्रकरण त्याच्या बाजूने निकाली काढण्यासाठी तब्बल एक कोटी ५० लाख रुपयांची लाच मागण्यात आल्याचा आरोप आहे.

मात्र, चर्चेनंतर लाचेची रक्कम ४० लाख रुपयांवर निश्चित करण्यात आली. याबाबत तक्रारदाराने सीबीआयकडे तक्रार केली. तक्रारीची दखल घेत सीबीआयने सापळा रचला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार खासगी मध्यस्थ नरेंद्र राजपूत याने तक्रारदाराकडून ४० लाख रुपयांची रोख रक्कम स्वीकारली.

त्याच वेळी दबा धरून बसलेल्या सीबीआयच्या पथकाने राजपूत याला रंगेहाथ पकडले. मध्यस्थाच्या चौकशीतून या कथित लाचखोरीच्या व्यवहाराचे धागेदोरे केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्याचे सीबीआयच्या तपासात समोर आले. त्यानंतर सीबीआयने विनय कुमार कांठेती, अतिरिक्त आयुक्त, केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळ आणि राकेश कुमार सिन्हा, अधीक्षक, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग, रायगड यांना अटक केली.

तिघांना अटक केल्यानंतर सीबीआयने त्यांच्या निवासस्थानांसह संबंधित ठिकाणी झडतीसत्र सुरू केले. या कारवाईदरम्यान सीबीआयच्या हाती मोठी रोकड आणि दागिने लागले. झडतीत ४३ लाख रुपये रोख जप्त करण्यात आले असून, सुमारे ९० लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिनेही हस्तगत करण्यात आले आहेत. या रोकड आणि दागिन्यांचा या लाचखोरीच्या प्रकरणाशी नेमका काय संबंध आहे, आरोपींकडे ही मालमत्ता कुठून आली, तसेच कथित लाचखोरीच्या व्यवहारामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सीबीआयकडून केला जात आहे.

## देशातील पहिला अंतराळ संशोधन मेळावा महाराष्ट्रात

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने भारतातील पहिल्या भव्य अंतराळ संशोधन मेळावाची घोषणा उद्योग मंत्री उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केली. हा मेळावा अंतराळ, विज्ञान आणि सायन्स-फिक्शन वर आधारित असणार आहे. असे सामंत यांनी सांगितले.

मुंबईतील नेहरू सायन्स सेंटर येथे हा कार्यक्रम आयोजित केला जाईल. अंतराळ क्षेत्रातील ज्ञान, नवकल्पना, गेमिंग आणि मनोरंजन यांना एकाच व्यासपीठावर आणून महाराष्ट्रातील स्पेस-टेक स्टार्टअप्सना जागतिक गुंतवणूकदार व तज्ज्ञांशी जोडणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.असे न नोडविण गेमिंग चे संस्थापक अक्षत राठी यांनी सांगितले.

जागतिक तज्ज्ञांची चर्चासत्रे, सायन्स-फिक्शन गेमिंग झोन, स्पेस तंत्रज्ञान प्रदर्शन आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष शाळा-कॉलेज उपक्रम आयोजित केले जातील. आय ए एस डॉ. पी. अनबलगन, आरती हरभजंका उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या निश्चित तारखा लवकरच अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केल्या जातील.




## खोपोली नगरपालिकेच्या हद्दीतील लवेज गावचा पाणीपुरवठा अखेर सुरळीत



**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगरपालिकेच्या हद्दीतील लवेज गावचा पाणीपुरवठा अखेर सुरळीत झाला आहे. पाणीपुरवठा सभापती विक्रम साबळे, अधिकारी अविनाश भोईर आणि त्यांच्या संपूर्ण टीमने सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे

गेल्या अनेक महिन्यांपासून लवेज गावातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता, ज्यामुळे ग्रामस्थांना (विशेषतः महिला वर्गाला) मोठा त्रास सहन करावा लागत होता. पाईपलाईनची गळती नेमकी कुठे आहे याचा शोध लागत नव्हता. अखेर एका कारखान्याच्या आवारातून गेलेल्या पाईपलाईनची गळती शोधण्यात प्रशासनाला यश आले.

गळती दुरुस्त करून पाणीपुरवठा पूर्ववत केल्यामुळे गावातील दुष्काळी परिस्थिती संपली असून नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.दरम्यान सुरू झालेला हा पाणीपुरवठा अखंडित चांगल्या प्रकारे सुरू ठेवावा, खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी असे ग्रामस्थांतर्फे उपनगराध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती विक्रम साबळे यांना विनंती करण्यात आली आहे.

## विविध उपक्रमांद्वारे नवी मुंबईत राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक कीर्तीचे हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणारा राष्ट्रीय क्रीडा दिन नवी मुंबईमध्ये घणसोली शाळेत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे आणि नवी मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्रीडा व जनजागृतीपर उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात संपन्न झाला.



या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके, मैदानी खेळ, शारीरिक तंदुरुस्तीचे उपक्रम तसेच मल्लखांबाची आकर्षक प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांना नियमित व्यायाम व खेळाचे महत्त्व समजावे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश त्यांच्या मनात खोलवर रूजावा या उद्देशाने आयोजित हा विशेष कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त सहभागाने यशस्वी झाला.

याप्रसंगी नगरसेवक तथा क्रीडा समिती सदस्य निशांत भगत, ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटके, नमुंमपा क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपआयुक्त अभिलाषा पाटील, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, राज्य क्रीडा मार्गदर्शक सौ. मनीषा मानकर, मुख्याध्यापिका अर्चना म्हात्रे तसेच क्रीडा शिक्षक संतोष मुंढे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी क्रीडा समिती सदस्य नगरसेवक निशांत भगत यांनी नवी मुंबईतील खेळाडूंच्या विकासासाठी महापालिकेच्या माध्यमातून अधिकाधिक दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली.

खेळाडूंसाठी आवश्यक क्रीडा मैदाने, प्रशिक्षण सुविधा, क्रीडा साहित्य तसेच इतर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी केली. नवी मुंबईतील खेळाडूंना चांगल्या सुविधा व योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते आणखी चांगल्या प्रकारे राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करू शकतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मेजर ध्यानचंद यांच्या प्रेरणादायी स्मृतींना अभिवादन करीत अत्यंत उत्साहाने राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.

## एक्सेल स्टॉपवरील खड्डे न बुजवल्यास भाजप करणार आंदोलन

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील एक्सेल स्टॉप परिसरात रस्त्यावर भलेमोठे खड्डे पडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक वर्षांपासून या ठिकाणी खड्ड्यांची समस्या कायम असून, सध्या मुसळधार पावसामुळे हे खड्डे पाण्याने भरले आहेत. त्यामुळे खड्ड्यांची खोली लक्षात येत नसल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून या मार्गावरून प्रवास करावा लागत आहे.



या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक, कामगार आणि विद्यार्थी ये-जा करतात. जवळच शाळा, बँका तसेच विविध कारखाने असल्याने या परिसरात मोठी वर्दळ असते. पाण्याने भरलेल्या भलेमोठ्या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांचा तोल जाण्याची शक्यता असून, यापूर्वीही अनेक स्थानिक नागरिक या खड्ड्यांमध्ये पडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एखादा गंभीर अपघात होण्यापूर्वी एमआयडीसी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

अनेक गावांना जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता असून सध्या पावसाचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचत आहे. दिवसा खड्डे दिसत असले तरी रात्रीच्या वेळी पाण्यामुळे त्यांचा अंदाज येत नसल्याने हा रस्ता वाहनचालकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरण्याची भीती व्यक्त होत आहे.

याबाबत भाजपा धाटाव विभागाध्यक्ष सचिन मोरे यांनी एमआयडीसी प्रशासनाला तीव्र शब्दांत इशारा दिला आहे. ते म्हणाले, एमआयडीसीने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे कायमस्वरूपी बुजवावेत. केवळ माती किंवा खडी टाकून तात्पुरती मलमपट्टी न करता खड्ड्यांचे योग्य पद्धतीने काँक्रिटीकरण करावे. एखादा मोठा अपघात घडून जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी एमआयडीसी प्रशासनाची असेल. तातडीने कार्यवाही न झाल्यास भारतीय जनता पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,

## रोटरी क्लब ऑफ पनवेलचा शैक्षणिक उपक्रम

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

दहावीच्या विद्यार्थ्यांना आधुनिक डिजिटल शैक्षणिक साधनांची सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असलेले ॲप मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




या ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा नियमित सराव, विषयांची उजळणी तसेच परीक्षेची प्रभावी तयारी करता येणार आहे. विद्यार्थ्यांनी या सुविधेचा योग्य उपयोग करून चांगला अभ्यास करावा आणि दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळवावेत, ही या उपक्रमामागील प्रमुख अपेक्षा आहे. आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा शैक्षणिक उपयोग करून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनविण्याचा रोटरी क्लब ऑफ पनवेलचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक साधनांचा लाभ मिळावा आणि त्यांच्या अभ्यासाला योग्य दिशा मिळावी, या दृष्टिकोनातून ही सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. या कार्यक्रमास जे.बी.एस.पी संस्थेचे व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख तसेच जे.बी.एस.पी संस्थेचे स्टेट बोर्ड स्कूल इन्स्पेक्टर संतोष चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यानंतर एम.एन.एम. विद्यालयाच्या प्राचाया सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोले मॅडम व पर्यवेक्षक अरुण जोशी सर उपस्थित होते. तसेच इयत्ता दहावीचे विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांचन माने यांनी केले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी या मोफत डिजिटल सुविधेचा जास्तीत जास्त उपयोग करून नियमित अभ्यास, सराव व पुनरावृत्ती करावी आणि परीक्षेत उत्तम यश संपादन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## कर्जतमध्ये दुकान, तर नेरळमध्ये बंद घर फोडले

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात महावीर पेठ मधील सिटी बाजार हे भर वस्तीतील दुकान फोडले त्यामधील दोन हजार पाचशे रुपये चोरट्याच्या हाती लागले. तर नेरळ मधील एक बंद घर फोडून सोन्याच्या दागिन्यांसह साडेतीन लाखांचा ऐवज चोरट्याने लंपास केला.

कर्जत शहरातील सिटी बाजार या दुकानाचे लोखंडी शटर उचकटून दुकानातील पंचवीसशे रुपयांची रक्कम लंपास केली तर या चोरट्याने जाता जाता पंचरत्न ट्रेडर्स चा फलक आणि त्याच्या मागे असलेली छत्री पळवली. हे दृश्य सी सी टीव्हीमध्ये कैद झाली आहे. मात्र चोरट्याने तोंडाला रुमाल बांधल्याने त्यांची ओळख पटत नाही.

नेरळ बेपोले हजारे नगर मधील दृष्टी आर्केड इमारतीतील बंद फ्लॅट फोडून सोन्याच्या दागिन्यांसह तीन लाख ७३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. दृष्टी आर्केडमधील काकडे कुटुंबीय घर बंद करून आपल्या ठाणे येथील मुलाकडे गेले होते. त्यांचे शेजारी असलेल्या सोपान शिंदे यांना काकडे यांचा दरवाजा फोडला असल्याचे निदर्शनास आले. काही तरी गडबड आहे. हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी लगेचच काकडे यांच्याशी संपर्क करून त्यांना माहिती दिली. काकडे कुटुंबीय तातडीने घरी आले.

अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून बेडरूम मधील लोखंडी कपाट फोडून त्यातील वीस ग्रामच्या सोन्याच्या अंगठ्या, सात ग्रामची सोन्याची साखळी, दहा ग्रामचा सोन्याचा ब्रेसलेट, दहा ग्रामचे सोन्याचे मंगळसूत्र आणि एक लाख ४५ हजार रुपयांची रोकड असा ३ लाख ७३ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला.

या चोरीचा अज्ञातांच्या विरुद्ध नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास करण्यासाठी रायगड जिल्हा फॉरेन्सिक पथकाने पहाणी केली असून ठसे व इतर पुरावे गोळा केले आहेत. पोलीस उप निरीक्षक सुशांत वरक अधिक तपास करीत आहेत.

## पोलादपूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ युवा संमेलन

**पोलादपूर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रायगड विभागाने नवे पर्व युवा सर्व या संकल्पनेतून १ सप्टेंबर २०२६ रोजी पोलादपूर येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये युवा संमेलनाचे आयोजन केले आहे. या संमेलनास आयपीएस अधिकारी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत असे पत्रिकेद्वारे आयोजकांनी कळविले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दायित्व रायगड विभाग प्रचार प्रमुख तसेच राज्याचे वित्त विभागाचे उपसंचालक आनंद बिंदू माधव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी साडेबारा ते अडीच वाजेपर्यंतच्या या युवा संमेलनामध्ये प्रारंभी अल्पोपहार, सामूहिक पखवाज वादन तसेच प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन होणार आहे. पोलादपूर तालुक्यातील सर्व युवा वर्गाने कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन पोलादपूर तालुका राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे करण्यात आले आहे.

## चिरनेरच्या शेतकऱ्यांचा कोल्हापूरला अभ्यास दौरा

**उरण : वार्ताहर**

नैसर्गिक व सेंद्रिय शेतीच्या दिशेने वाटचाल करीत उरण तालुक्यातील चिरनेर येथील शेतकरी शेतीच्या क्षेत्रात नाविन्य प्रयोग करण्यासाठी तसेच शास्त्रज्ञ व प्रगतशील शेतकरी, कृषी संस्था व विविध शेती क्षेत्रांच्या भेटीतून, शेतकऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्याच्या उद्देशासाठी उरण तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा अंतर्गत अलिबागच्या प्रकल्प संचालक श्रीमती वंदना शिंदे व उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ-नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यांतर्गत प्रशिक्षण अभ्यास दौऱ्याचे तीन दिवसीय आयोजन कोल्हापूर कणेरी येथे नुकतेच करण्यात आले होते.



या प्रशिक्षणात २० शेतकरी सहभागी झाले होते.तर या प्रशिक्षणाचे नेतृत्व महाराष्ट्र शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी केले होते. या प्रशिक्षणात शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती, मृदा, आरोग्य, अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी निविष्ठा, नैसर्गिक शेती संकल्पना, उद्देश व कार्यपद्धती, समूह चर्चा यासह नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक देशी गायींचे महत्त्व, त्यांचे संगोपन, त्यांना होणारे आजार या विषयी माहिती देण्यात आली. यावेळी जैविक खतांची निर्मिती आणि त्याचा योग्य वापर प्रसार व शेतीतील महत्त्व यावर सखोल मार्गदर्शनातून माहिती देण्यात आली. रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत असताना नैसर्गिक आणि जैविक शेती पर्याय ठरू शकतो. असे मत कृषी अधिकाऱ्यांनी मार्गदर्शनातून मांडले.

यावेळी उत्पादन खर्चात बचत होऊन जमिनीचे आरोग्य सुधारते आणि दर्जेदार उत्पादन मिळण्यास मदत होते. असेही सांगितले गेले. भविष्यातील शेती अधिक सक्षम पर्यावरण पूरक व आर्थिक दृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी नैसर्गिक शेतीचे महत्व या प्रशिक्षणातून अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते. शेतकऱ्यांना शेती विकासासाठी एक नवी दिशा मिळाली. नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून शाश्वत शेतीचा आदर्श निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांचा हा प्रयत्न तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असाच ठरला.

# चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन, संस्कृत दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य कैलास म्हात्रे, पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने रक्षाबंधन कार्यक्रम गुरुवार ( दि. २७) रोजी मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमा अंतर्गत विदयार्थिनींनी भावांना राखी बांधून व औक्षण करून त्यांच्या आयुष्याच्या सुख, समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना केली. भावांनीही बहिणींना भेटवस्तू देऊन प्रेम व आपुलकीचा बंध दृढ केला.



यावेळी विदयार्थ्यांनी रक्षाबंधनाची परंपरा व त्यामागील सामाजिक संदेश जोपासला. आजच्या आधुनिक काळात रक्षाबंधन हा भावनिक बंध जपण्याचा नात्यांना आधार देण्याचा आणि परस्पर सन्मान टिकवण्याच्या स्वरूपाचा एक सुंदर उत्सव आहे. असा संदेश विदयार्थ्यांच्या मनात रुजवून मोठया आनंदात हा कार्यक्रम विदयालयातील इयत्ता पाचवी ते दहावीचे सर्व विदयार्थी , सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत मोठया आनंदात साजरा करण्यात आला.

**संस्कृत दिन उत्साहात साजरा**

चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय, नवीन पनवेल येथे संस्कृत दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्कृत विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात अथर्वशीर्षने झाली

विदयार्थ्यांनी संस्कृत श्लोक, संस्कृत गीते, संवाद, नाटिका व संस्कृत भाषेचे महत्त्व सांगणारी भाषणे सादर केली. तसेच संस्कृत दिनानिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे तसेच प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले.

विदयालयाच्या मुख्याध्यापकांनी विदयार्थ्यांना संस्कृत भाषेचे महत्त्व सांगून संस्कृत भाषेचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. विदयार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.कार्यक्रमासाठी विदयालयाचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे सर तसेच पर्यवेक्षक ठाकूर सर आणि संस्कृत शिक्षिका देशमुखे उपस्थित होते

# सीकेटी प्राथमिक विद्यालयात 'स्वच्छ महाराष्ट्र मिशन २०२६'

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे, चांगू काना ठाकूर मराठी प्राथमिक विद्यालय,नवीन पनवेल. येथे शनिवार, दिनांक २९ ऑगस्ट रोजी पनवेल महानगरपालिकेतर्फे 'स्वच्छ महाराष्ट्रमिशन २०२६' अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी पनवेल महानगरपालिकेतील अधिकारी गिरीश आढाव यांनी इयत्ता–दुसरी, तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, कचरा कमीकरणे तसेच स्वच्छता राखण्याचे महत्त्व याबाबत सखोल व मार्गदर्शनपर माहिती दिली. दैनंदिन जीवनातकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, ओला व सुका कचरा वेगळा कसा करावा आणि स्वच्छ परिसरराखण्यासाठी विद्यार्थ्यांची भूमिका काय असावी, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शनादरम्यान श्री. आढाव यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून त्यांच्या ज्ञानाची उजळणी केली. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे व आनंदाने सहभाग घेत सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे दिली.त्यामुळे कार्यक्रमामध्ये उत्साहपूर्ण व संवादात्मक वातावरण निर्माण झाले.यावेळी मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे माननीय मुख्याध्यापक सुभाष मानकर उपस्थित होते. तसेच विद्यालयातील शिक्षकवृंदही या कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.

'स्वच्छता हीच सेवा, स्वच्छता हीच जबाबदारी' हा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणारा आणि स्वच्छ,सुंदर व निरोगी परिसर निर्माण करण्यासाठी प्रेरणा देणारा हा कार्यक्रम उत्साहात झाला.

# पनवेल गांजा तस्करी प्रकरणात मुख्य सूत्रधार महिलेसह चौघे अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील पंचशील नगर झोपडपट्टीत छापा टाकून गांजा विक्री करणाऱ्या दोघांना अटक केल्यानंतर अमली पदार्थविरोधी कक्षाने या प्रकरणाचा अधिक तपास करत मुख्य सूत्रधार महिलेसह आणखी तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी शकील मोहम्मद आयुब शेख याला ताब्यात घेत त्याच्या घरातून सुमारे १ लाख ५ हजार रुपये किमतीचे ३.५ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) जप्त केले आहे.त्यानंतर या ड्रग्ज विक्री प्रकरणातील मुख्य सूत्रधार राणी रवी जोसेफ हिच्यासह नितीन रमेश चौहान ऊर्फ नितीन भैय्या आणि प्रदीप कमलाकर गायकवाड या तिघांना २६ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली आहे.

अमली पदार्थविरोधी कक्षाने पंचशील नगर परिसरात कारवाई करून कबीर सलीम शेख (१९) आणि विकास ऊर्फ विक्की कलाप्पा गायकवाड (२२) यांना अटक केली होती. या कारवाईत पोलिसांनी ५१० ग्रॅम गांजा, तीन महागडे मोबाईल, रोख रक्कम आणि इतर साहित्य असा एकूण ५ लाख ७२ हजार १७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता.

या प्रकरणाच्या पुढील तपासात पोलिसांनी शकील मोहम्मद आयुब शेख याला ताब्यात घेतले. पनवेल येथील त्याच्या घराची झडती घेतली असता ३.५ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) आढळून आले. त्यामुळे पनवेल परिसरात केवळ गांजाच नव्हे, तर इतर अमली पदार्थांचाही पुरवठा सुरू असल्याचे तपासातून समोर आले आहे.

पोलिसांच्या तपासात राणी रवी जोसेफ ही गांजा विक्रीच्या नेटवर्कची मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले आहे. तिच्यासह नितीन रमेश चौहान ऊर्फ नितीन भैय्या आणि प्रदीप कमलाकर गायकवाड यांना अटक करण्यात आली. या कारवाईमुळे पनवेलमधील अमली पदार्थ विक्रीच्या साखळीतील महत्त्वाचे दुवे पोलिसांच्या हाती लागले आहेत.

दरम्यान, या गुन्ह्यातील नवाज शेख, अरुण लाल सय्यद, रईस लाल सय्यद, रईस सय्यद, तातू शेख, आकाश जोसेफ आणि गोवंडीतला सलमान हे सात आरोपी अद्याप फरार असून, त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती अमली पदार्थविरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निघडे यांनी दिली.

आरोपींच्या चौकशीत गोवंडी ते पनवेलदरम्यान सुरू असलेल्या अमली पदार्थांच्या पुरवठ्याचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले आहेत. त्यामुळे या संपूर्ण ड्रग्ज सिंडिकेटचा आर्थिक व्यवहार, अमली पदार्थांचा पुरवठा आणि विक्रीचे जाळे याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.पनवेल परिसरातील अमली पदार्थांच्या नेटवर्कमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, या टोळीला अमली पदार्थांचा पुरवठा कुठून होत होता, याचाही तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# परदेशी पर्यटकाची ९० हजारांची बॅग चोरीला

**पनवेल : वार्ताहर**

अमेरिकेतून पर्यटनासाठी भारतात आलेल्या ४२ वर्षीय परदेशी पर्यटकाची सुमारे ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल असलेली बॅग चोरीला गेल्याची घटना पनवेल तालुक्यातील नावडे गावाजवळ घडली. घडलेल्या या घटनेप्रकरणी तळोजा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

संबंधित पर्यटक सोमवारी रात्री तो विलेपार्ले येथून परतत होता. नावडे गावाजवळ आल्यानंतर त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने`.टॅक्सीमधून खाली उतरल्यानंतर तो पदपथावर बसला आणि टॅक्सी चालकाला पुढे जाण्यास सांगितले. यावेळी त्याने आपली बॅग पदपथावर ठेवली होती.

# गतिमंद तरुणीवरील अत्याचार प्रकरण ; आठ संशयितांचे डीएनए नमुने निगेटिव्ह

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

एका गतिमंद तरुणीवर अत्याचार करून ती तरुणी गर्भवती राहिली आणि तिने एका मुलीला जन्म दिला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात जून महिन्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी संशयितांचे डीएनए नमुने घेतले होते. मात्र आठही जणांचे डीएनए नमुने ऑगस्ट महिन्यात निगेटिव्ह आले आहेत. त्यामुळे या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी पोलिसांना आणखी कष्ट घ्यावे लागणार आहेत.

पनवेल तालुक्यातील २४ वर्षीय गतिमंद तरुणीवर अत्याचार केल्यानंतर तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला. रुग्णालयात तिच्यावर उपचार करण्यात आले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला. या प्रकरणात आरोपीची ओळख पटवण्यासाठी पोलिसांनी संशयित व्यक्तींवर लक्ष केंद्रित केले. यावेळी ज्या ठिकाणी ती गतिमंद तरुणी राहत होती त्या ठिकाणच्या संशयित आठ जणांचे डीएनए नमुने पोलिसांनी घेतले आणि ते कलीना येथे पाठवले. मात्र काही दिवसांनी या डीएनए नमुन्याचा रिपोर्ट पोलिसांना प्राप्त झाला. आठही जणांचे डीएनए नमुने निगेटिव्ह आल्याने तालुका पोलिसांचे काम वाढले आहे.

त्यामुळे या तरुणीवर अत्याचार करणारा आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेला नसून, त्याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा विविध अंगांनी तपास सुरू असून, आणखी संशयितांची चौकशी आणि नमुने तपासण्याची शक्यता आहे. पोलिसांकडून पीडित तरुणीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींची माहिती, घटनाक्रम आणि उपलब्ध पुरावे यांची तपासणी केली जात आहे. तसेच या प्रकरणात आणखी कोणत्या व्यक्तींचा सहभाग किंवा संशयास्पद हालचाली होत्या का, याचा तपास केला जात आहे.

या गंभीर प्रकरणातील खऱ्या आरोपीचा शोध घेणे हे पोलिसांसमोरचे प्रमुख आव्हान आहे. या प्रकरणी वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष डीगे अधिक तपास करत आहेत.

# पालकमंत्री भरत गोगावले यांच्याकडे बहुउद्देशीय पत्रकार भवनासाठी भूखंडाची मागणी




**पनवेल : वार्ताहर**

रायगडचे नवनिर्वाचित पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांची पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सदस्यांनी गुरुवारी पनवेल येथे भेट घेतली. यावेळी पनवेल तालुक्यात प्रस्तावित असलेल्या बहुउद्देशीय पत्रकार भवनासाठी मोकळा भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करणारे निवेदन मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या हस्ते पालकमंत्र्यांना देण्यात आले.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंच हा गेल्या अनेक वर्षांपासून शासनाकडे नोंदणीकृत असलेला पत्रकारांचा मंच आहे. पत्रकारिता क्षेत्रातील कार्यासोबतच मंचाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. पर्यावरण संवर्धन, रक्तदान शिबिरे, तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शाळोपयोगी साहित्याचे वाटप अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून मंचाने सामाजिक बांधिलकी जपली आहे.

मंचाच्या सामाजिक कार्याचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असल्याने पत्रकारांसाठी तसेच विविध सामाजिक उपक्रमांसाठी पनवेल तालुक्यात बहुउद्देशीय पत्रकार भवन उभारण्याचा प्रस्ताव आहे. या भवनासाठी शासनाकडून मोकळा भूखंड उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी मागणीबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे पत्रकार मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

याप्रसंगी पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार दीपक घोसाळकर, सिटीबेलचे संपादक विवेक पाटील, पत्रकार संजय कदम आणि दत्ता कुलकर्णी उपस्थित होते.

# १२ वर्षीय मुलीसह आई बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील सोमाटणे परिसरातून ३० वर्षीय महिला आणि तिची १२ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून, दोघींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

पूजा काना मोरे (वय ३०) आणि त्यांची मुलगी दिव्या काना मोरे (वय १२) अशी बेपत्ता झालेल्या मायलेकींची नावे आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, पूजा मोरे या कामावर गेल्या होत्या. त्यानंतर त्यांची मुलगी दिव्या हिलाही शाळेतून सोबत घेऊन त्या कोणालाही काही न सांगता निघून गेल्या. त्यानंतर मायलेकी घरी परतल्या नसल्याने कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला. मात्र, काहीही माहिती न मिळाल्याने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

# शिवशंभो सिग्नलवर विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे

**पनवेल : वार्ताहर**

वाहतूक नियमांचे पालन, रस्ते सुरक्षा आणि सुरक्षित प्रवासाबाबत विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पनवेल शहरात वाहतूक पोलिसांकडून विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. 'शाळा दत्तक' उपक्रमांतर्गत शिवशंभो सिग्नल नाका येथे शिक्षक व विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देण्यासोबतच प्रत्यक्ष सिग्नलवर प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.पोलीस उपायुक्त, वाहतूक, नवी मुंबई तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक शाखेचे वपोनि औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना रस्त्यावरून सुरक्षितपणे प्रवास करताना घ्यावयाची काळजी, वाहतूक सिग्नलचे पालन, पादचारी मार्गाचा वापर आणि



वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करणे का आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

केवळ वर्गामध्ये वाहतूक नियमांची माहिती न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सिग्नलवर नेऊन वाहतूक नियमनाची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. सिग्नलवरील वाहतुकीची स्थिती, वाहनांना थांबण्याचे व पुढे जाण्याचे संकेत, पादचाऱ्यांनी रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी तसेच वाहतूक पोलिसांकडून वाहतुकीचे नियमन कशाप्रकारे केले जाते, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने अपघातांचा धोका वाढतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच वाहतूक शिस्तीची सवय निर्माण झाल्यास भविष्यात जबाबदार वाहनचालक आणि जागरूक नागरिक घडण्यास मदत होईल, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.या जनजागृती अभियानाला शिक्षक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. उपस्थित नागरिकांनाही वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बीट मार्शल क्रमांक १ चे पोलीस हवालदार अमीर मुलाणी आणि पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ यांनी विशेष सहभाग घेतला. त्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वाहतूक व्यवस्थेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.'शाळा दत्तक' उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक शिस्तीची जाणीव निर्माण करण्याबरोबरच नागरिकांमध्येही रस्ते सुरक्षेबाबत जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न वाहतूक पोलिसांकडून करण्यात आला.

# विचुंबे मराठी शाळेत विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विचुंबे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून वह्यांचे वाटप तसेच चित्रकला स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला पंचायत समिती सदस्या नीलम भिंगारकर, सरपंच प्रमोददा भिंगारकर, प्रभारी सरपंच भरत पाटील, बळीराम पाटील, भाई भोईर, अविनाश गायकवाड, अण्णा गायकवाड, श्रावणी भोईर, प्रगती गोधळी, नविता भोईर उपस्थित होते.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन विविध क्रीडा व शैक्षणिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखविण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी रस्सीखेच, कॅरम, बुद्धिबळ, डॉजबॉल आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



यावेळी परिपाठामध्ये क्रीडाविषयक प्रश्नमंजुषा घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना 'क्रीडा भावना' शपथ देण्यात आली. याप्रसंगी द्रोणागिरी क्रीडा महोत्सव, उरण येथे आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून विजेते ठरलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व पदके देऊन गौरविण्यात आले.

तसेच रायगड जिल्हा लंगडी असोसिएशन व के.एल.ई. सोसायटी विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रायगड जिल्हा लंगडी अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये स्कुलमधील १४ वर्षांखालील मुलांच्या संघाने चतुर्थ, तर मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला. या यशस्वी विद्यार्थ्यांचाही शाळेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

क्रीडा प्रशिक्षक संग्राम फोपेरकर व श्रीमती ऋषाली लोखंडे यांच्या प्रयत्नातून राष्ट्रीय क्रीडा दिनाचा हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

# नवीन पनवेलमध्ये वृद्धाची डिजिटल अरेस्ट; आठ दिवसांत १३ लाख उकळले

**पनवेलः वार्ताहर**

नवीन पनवेल येथे राहणाऱ्या ६२ वर्षीय सेवानिवृत्त वृद्धाला राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित खोट्या गुन्ह्यात अटक करण्याची भीती दाखवून सायबर टोळीने तब्बल १३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी तब्बल आठ दिवस वृद्धाला घरातील एका खोलीत स्वतःला बंद करून ठेवण्यास भाग पाडत व्हिडिओ कॉलद्वारे त्यांच्या हालचालींवर नजर ठेवली. अखेर पत्नीला संशय आल्याने हा प्रकार समोर आला.

तक्रारदार वृद्धाशी एका सायबर ठगाने संपर्क साधला. त्याने स्वतःची ओळख 'भारतीय डेटा सेंटर'चा पोलिस अधिकारी रोहित कुमार अशी करून दिली. वृद्धाच्या नावाने बंदी घातलेल्या पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाने (पीएफआय) कॅनरा बँकेत बनावट खाते उघडल्याचा तसेच त्यांच्या नावावरील सिमकार्डचा गुन्ह्यात गैरवापर झाल्याचा दावा आरोपीने केला.

यानंतर टोळीतील आरोपींनी पोलिस गणवेशात आणि पोलिसांचा लोगो असलेल्या पार्श्वभूमीतून व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉल केला. हे प्रकरण राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्याचे सांगत वृद्धाला कोणालाही काहीही न सांगण्याची धमकी देण्यात आली. तसेच एका खोलीत स्वतःला बंदिस्त करून घेण्यास भाग पाडण्यात आले.

वृद्धावर सतत व्हिडिओ कॉलद्वारे नजर ठेवण्यात आली. या प्रकरणातून सुटका करून देण्याचे आमिष दाखवत आरोपींनी सर्वोच्च न्यायालय आणि अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) नावाचा धाक दाखवला. त्यानंतर वृद्धाकडून बँकेतील ८ लाख आणि ५ लाख रुपयांच्या मुदत ठेवी मोडून घेण्यात आल्या.

आरोपींनी वृद्धाला एकूण १३ लाख रुपये जळगाव येथील आयसीआयसीआय बँकेतील 'ग्लोबल केमोटेच' नावाच्या चालू खात्यावर वर्ग करण्यास भाग पाडले. दुसऱ्या दिवशी पुन्हा व्हिडिओ कॉल करून घरातील सोने आणि अन्य बँक खात्यांमध्ये असलेल्या पैशांची माहिती मागण्यात आली.यावेळी वृद्धाच्या पत्नीला संशय आल्याने त्यांनी खांदेश्वर पोलिस ठाण्यात धाव घेतली.

# हॉटेल सी रॉकचे चित्रपटसृष्टीशी नातेसंबंध...







चित्रपटाच्या जगात एवढे, असे आणि इतके रंग एकमेकांत मिसळले गेले आहेत की त्याचा शोध अजिबात संपायचा नाही. अशीच एक भन्नाट आणि भारी गोष्ट, आपल्या चित्रपटसृष्टीचे मुंबईतील पंचतारांकित हॉटेलशी असलेले नातेसंबंध. हा रंगीत (कलरफुल्ल) विषय वरकरणी दिसतो तसा केवळ तपशील, माहिती आणि संदर्भ सांगण्यापुरता नाही. त्यात केवढी तरी विविधता आहे हे सिनेपत्रकारितेच्या निमित्ताने केलेल्या भटकंती, भेटीगाठी आणि निरीक्षण यातून अधोरेखित होत गेले. रुपेरी पडद्यावर येत असलेल्या, दिसत असलेल्या गोष्टीच्या पाठीमागे, पलीकडे, अवतीभवती बरंच काही आहे. असाच एक स्पॉट, हॉटेल सी रॉक.

आज वांद्रे येथील बॅण्ड स्टॅंडचा परिसर एका खास गोष्टीसाठी ओळखला जातो, चर्चेत असतो, न्यूजमध्ये असतो, तो म्हणजे शाहरुख खानचा मन्नत बंगला. त्या परिसरात कोणत्याही वेळी जावं तर भाईचे ( अर्थात एस आर के) चाहते या बंगल्यासोबत फोटो अथवा सेल्फी घ्यायला उत्सुक असल्याचे हमखास पाहायला मिळते. मध्यंतरी एका इंग्रजी वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार देश विदेशातील अगणित पर्यटक मुंबईत फिरायला आल्यावर सर्वाधिक प्रमाणात गेट वे ऑफ इंडिया येथे भेट देतात आणि मग त्यानंतर मन्नत बंगल्याचा दुसरा क्रमांक आहे.

काही वर्षांपूर्वीपर्यंत याच बॅण्ड स्टॅंड येथील हॉटेल सी रॉक लक्षवेधक ठरत होते. आज जेथे ताज लॅण्ड हॉटेलची भव्य दिव्य दिमाखदार वास्तू उभी आहे, त्याच्या अगदी समोरच हॉटेल सी रॉक होते. १९७७ साली सुरू झालेले हे हॉटेल साधारण २००० सालापर्यंत वैभवात उभे होते आणि हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत त्याचाही विशेष वाटा आहे. ती वास्तू पाडल्यानंतर खरंतर तेथे काहीच नव्हते. पण आता त्या जागेवर एक वास्तू उभी राहत आहे. तेही पंचतारांकित हॉटेलच आहे अथवा अन्य काही आहे ते अजून स्पष्ट झालेले नाही. काही जरी असले तरी हिंदी चित्रपटसृष्टी आणि सी रॉक यांच्या नात्यातील वीण सांगायला हवीच.

१९८३ सालची गोष्ट. मी मीडियात नवीनच होतो. चित्रपटांतून अधूनमधून मुंबईतील पंचतारांकित हॉटेल संस्कृती पहात होतो (यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार' मध्ये नरीमन पॉइंट येथील ओबेरॉय हॉटेल), तर कधी जुहू येथील सन अॅण्ड सॅण्ड हॉलमधील एखाद्या सुपर डुपर हिट चित्रपटाच्या पार्टीचे फोटो पाहत होतो. पण जेव्हा प्रत्यक्षात या पंचतारांकित हॉटेलमध्ये जाण्याचा योग आल्यावर मध्यमवर्गीय संकोच कायम राहणारच.

मी सी रॉकला पहिल्यांदा पाऊल टाकले ते कंवल शर्मा दिग्दर्शित 'जिम्मेदार' चित्रपटाच्या मुहूर्ताच्या वेळी! राजीव कपूर, टीना मुनिम, अनिता राज आणि अनुपम खेर यांच्या प्रमुख भूमिका. आमंत्रणावरची साडेसात वाजता अशी वेळ वाचून ठीक वेळेवर सी रॉकला पोहोचलो तेव्हा हॉलची सजावट चालली होती (तात्पर्य आमंत्रणावर दिलेल्या वेळेवर या चित्रपटसृष्टीत काहीही घडत नाही हा पहिला धडा घेतला आणि तो कायमच पाळला.) कवल शर्मा अनेक वर्षे मनमोहन देसाई यांच्याकडे सहाय्यक दिग्दर्शक होता म्हणून त्यांच्या शुभ हस्ते या चित्रपटाचा मुहूर्त आणि आपला सुपुत्र या चित्रपटात नायक आहे म्हणून त्याला आशीर्वाद द्यायला चक्क राज कपूर. (लहानपणापासून पडद्यावर पाहिलेली गोरी गोरी गोमटी माणसं अशी चक्क काही अंतरावरच प्रत्यक्षात दिसताहेत हे स्वप्नवतच होते. पण प्रत्यक्षात होते.) रात्री उशिरापर्यंत हा मुहूर्त रंगला हे आठवतंय. चित्रपटसृष्टीचा कारभार घड्याळाची गरज नाही या अलिखित नियमानुसार चालतो हेही समजलं.

सी रॉकमध्येच अनिल शर्मा दिग्दर्शित 'हुकुमत' या चित्रपटाच्या मुहूर्त दृश्यात सदाशिव अमरापूरकर हे एका पाळीव कुत्र्याशी संवाद साधताहेत हे दृश्य पाहून खरंच आनदलो. याचं कारण, यातून या चित्रपटातील खलनायकाला मुहूर्त दृश्यात महत्व दिले. सदाशिव अमरापूरकर यांना ही गोष्ट आवर्जून सांगितली. विशेष म्हणजे मुहूर्त पार पडला आणि धर्मेंद्रचे आगमन झाले. वातावरण अतिशय खेळीमेळीचे होते. नवीन चित्रपटाचा मुहूर्त ही गोष्ट त्या काळातील चित्रपटसृष्टीसाठी जणू एक सण असे. फिल्मी पाहुणे भला मोठा पुष्पगुच्छ आणणार आणि मुहूर्त दृश्य पार पडतोय तोच टाळ्या आणि लगोलग हाती मिठ्ठास पेढा.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

याच सी रॉकच्या स्वीमिंग पुलावरही काही चित्रपटांचे झक्कास मुहूर्त रंगले. अनिल शर्मा दिग्दर्शित 'शेर' या चित्रपटाच्या मुहूर्ताच्या वेळचा अनुभव भन्नाट आहे. मुहूर्ताच्या वेळेपासून तासाभराने एकेक तारा तारका स्वीमिंग पुलावर येऊ लागले. फ्लॅश उडू लागले. किमी काटकर नेहमीप्रमाणेच आपल्या आईसोबत आली. स्वप्ना आली. रणजीत आला. धर्मेंद्रची वाट पाहिली जात होती. अर्थात तोच 'शेर' होता आणि तो आला, आम्ही त्याला पाहतोय, तो मात्र किमी काटकरला पाहत होता आणि अगदी अनपेक्षितपणे त्याने छान हसत असलेल्या किमी काटकरचे चक्क चुंबन घेतले. तेही ओठांचे. ती या धक्क्याने बावरली, घाबरली की सुखावली हे कळले नाही आणि कळून उपयोगही नव्हता. फोटो मात्र भरभरुन निघाले आणि या चित्रपटाचं अस्तित्व या फोटोपुरतेच राहिले. कारण हा चित्रपट मुहूर्तानंतर बंद पडला तो कायमचाच. ते काही असो. चित्रपटसृष्टीतील भटकंतीत असं काही लाईव्ह, चालतं बोलतं, घडतं पाहायला मिळेल हे सांगता येत नाही म्हणून त्या फिरण्यात गंमत आहे.

या पंचतारांकित हॉटेलमध्ये फिल्मी पार्ट्या तर केवढ्या तरी होत. मला आठवतंय जवळच्याच मेहबूब स्टुडिओत सुभाष घई दिग्दर्शित 'कर्मा' या चित्रपटाच्या भर दुपारच्या अतिशय जोरदार लक्षवेधक मुहूर्तानंतर याच सी रॉकच्या प्रशस्त हॉलमध्ये विशेष मेजवानी आयोजित केली होती आणि या चित्रपटातील नायिका तोपर्यंत निश्चित न झाल्याने या मेजवानीला डिंपल कपाडिया, पूनम धिल्लो, मीनाक्षी शेषाद्री होत्या. आपल्याला करारबद्ध करण्यात यावे यासाठी अशी हजेरी आणि भेटीगाठी घ्याव्या लागतातच.

याच सी रॉकच्या अगदी टॉपवरच्या फिरत्या स्पॉटची केवढी खासियत होती (चर्चगेट येथील ॲम्बेसेडर हॉटेल आणि सी रॉक या दोनच ठिकाणी हे अतिशय हळुवार आणि नकळतचे फिरणं). येथे एस. रामनाथन दिग्दर्शित 'गिरफ्तार' ची पार्टी रंगली होती. सिनेपत्रकारितेने हेदेखील दिले. याच सी रॉकच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या मिनी थिएटरमध्ये आम्हा सिनेपत्रकारांना कधी आगामी चित्रपटाची गाणी दाखवली जात. तेथे डबिंगही होत असे. अतिशय प्रशस्त आणि अगदीच मोजक्या पंचवीस आरामदायक आसनाचे असं ते होतं. काही झाले तरी ते पंचतारांकित हॉटेलमध्ये होते.

श्रीदेवीचे कारकिर्दीच्या सुरुवातीच्या दिवसात मुंबईत आपलं घर नव्हते (घराची समस्या अशी सर्व सामाजिक स्तरावर). अनेक वर्षे ती याच सी रॉकमध्येच राहायची. आता तिच्या तारखांनुसार निर्माते महागडं भाडे भरत होते अथवा कसं याचा त्या काळातील मीडियाने शोध घेतला नाही. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल मीडियाला त्यात स्टोरी दिसली असती. काही सांगता येत नाही.

सी रॉकच्या पबमध्ये 'हमला' या चित्रपटातील मादक मोहक गाण्याचं किमी काटकरवर चित्रीकरण असतानाच नेमकं दिग्दर्शक एन. चंद्रा यांच्या सांगण्यावरून मुलाखतीसाठी जाणं झालं. एन. चंद्रा यांचे गाण्याचं चित्रीकरण हा एक वेगळाच अनुभव असतो. त्यांचं व्हिजन जबरदस्त. त्या काळातील यशस्वी पटकथा लेखक के. के. शुक्ला यांचे अतिशय आवडते हॉटेल सी रॉक. विशेष उल्लेखनीय गोष्ट यातील बारमध्ये ते आपल्या भेटीसाठी अथवा मुलाखतीचे ठरवतं. त्या काळातील फिल्मवाले असे दिलदार आणि दिलखुलास असत. वागण्यात, बोलण्यात, विचारात हिशोबीपणा नसे.

आता एक वेगळी आठवण. तेजाब, राम लखन आणि त्रिदेव यांनी यशाची हॅट्ट्रिक साधली आणि माधुरी दीक्षित स्टार झाली. तिच्या अनेक नवीन चित्रपटांचे मुहूर्त होऊ लागले. त्यात एक चित्रपट होता, सुशील मलिक दिग्दर्शित 'अन्नदाता'. आणि नायक संजय दत्त. सी रॉकच्या वरच्या मजल्यावर पाठीमागे एक मोठ्या कटआउटसमोर मुहूर्त दृश्य होते. दुपारी अकरा वाजताची वेळ असताना साडेबारा वाजले तरी काहीच हालचाल दिसेना. फोटोग्राफर्सची चलबिचल सुरू झाली, फार उशीर होतोय असं म्हटलं जाऊ लागले आणि मग एकदाचं संजू आणि माधुरीवर मुहूर्त दृश्य पार पडले, पण चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होण्याआधीच तो बंद पडला. सुरुवातच अडखळत झाल्यावर काय हो?

अशा सी रॉकमध्येच १२ मार्च १९९३ रोजी मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटातील एक येथे झाल्याचे वृत्त आले आणि त्यानंतर या सी रॉकची झळाळी उतरु लागली. काही वर्षांनी ते बंद पडले आणि मग पाडलेही गेले. आता त्या जागेवर नवीन बांधकाम सुरू आहे असे वृत्त समजले आणि हा फ्लॅशबॅक तुमच्यासमोर उभा केला. चित्रपटाच्या जगात अनेक लहान मोठ्या जागा, ठिकाणं, स्थळं, वास्तू यांचा सहभाग आहे, समावेश आहे. त्यात पंचतारांकित हॉटेलही आहेत आणि तेथील अशा अनेक गोष्टी, आठवणी, किस्से, कथा आहेत.

# नक्षलोत्तर गडचिरोली : समृद्धीच्या नव्या क्षितिजांकडे


स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आलेला गडचिरोली आज परिवर्तनाच्या ऐतिहासिक आणि निर्णायक टप्प्यावर उभा आहे. घनदाट अरण्ये, विपुल खनिजसंपदा, समृद्ध जैवविविधता आणि वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी संस्कृती लाभलेल्या या जिल्ह्याची अनेक दशके 'अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त' अशी ओळख होती. मात्र, आता ही ओळख वेगाने बदलत आहे. एकेकाळी नक्षलवादाच्या सावटामुळे विकासाच्या संधींपासून दूर राहिलेला गडचिरोली आज शांतता, सुरक्षितता, उद्योग, आधुनिक पायाभूत सुविधा आणि मानवी विकासाच्या बळावर महाराष्ट्राचे नवे विकास केंद्र म्हणून आकार घेत आहे.

मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर सातत्याने झालेल्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यात शांतता आणि स्थैर्याचा मजबूत पाया निर्माण झाला आहे. पोलीस व केंद्रीय सुरक्षा दलांच्या प्रभावी मोहिमा, आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरण आणि दुर्गम भागांतील सुरक्षा यंत्रणेची वाढलेली उपस्थिती यामुळे नक्षलवादाचा प्रभाव जवळपास संपुष्टात आला. त्यातून प्रशासनाची पोहोच वाढली आणि वर्षानुवर्षे रखडलेल्या विकासकामांना गती मिळाली. भयाचे वातावरण कमी होत असताना नागरिकांचा शासन आणि लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही दृढ होत आहे.

गडचिरोली पोलीस दलाने पारंपरिक सुरक्षा भूमिकेपलीकडे जाऊन 'पोलीस दादालोरा खिडकी'च्या माध्यमातून शासन आणि दुर्गम आदिवासी समाज यांच्यात विश्वासाचा महत्त्वाचा दुवा निर्माण केला आहे. शासकीय योजना, प्रमाणपत्रे, आरोग्य सेवा, रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षण नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात या उपक्रमाची महत्त्वाची भूमिका आहे. शरणागत नक्षलवाद्यांना साक्षरता आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थिर करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

या बदलाचे आश्वासक प्रतिबिंब लोकशाही प्रक्रियेत दिसते. एकेकाळी निवडणुकांवर बहिष्काराचे आवाहन होत असलेल्या दुर्गम व अतिसंवेदनशील भागांतही नागरिक आता निर्भयपणे मतदानासाठी पुढे येत आहेत. २०२४मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील विक्रमी मतदान हे भयातून विश्वासाकडे झालेल्या वाटचालीचे प्रतीक ठरले. नक्षलोत्तर गडचिरोलीमध्ये प्रशासनाची कार्यपद्धतीही बदलत आहे. धरती आबा, विशेष सर्वेक्षण, सेवा समृद्धी, छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान आणि ग्रामसंवाद कार्यक्रमांच्या माध्यमातून अधिकारी दुर्गम गावांत जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. गुरनोली येथे राज्याच्या मुख्य सचिवांनी नागरिकांशी संवाद साधला, तर एकेकाळी नक्षलवादाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या बिनागुंडा येथे जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. नागरिकांनी प्रशासनाकडे येण्याची वाट पाहण्याऐवजी प्रशासनाने नागरिकांपर्यंत पोहोचावे, अशी नवी कार्यसंस्कृती विकसित होत आहे. वेगाने होणारे औद्योगिकीकरण आणि नागरीकरण लक्षात घेऊन संपूर्ण महसूल जिल्ह्यासाठी स्वतंत्र 'गडचिरोली प्रदेश' घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे औद्योगिक विकास, कृषी, वन, वाहतूक, निवासी गरजा आणि पर्यावरण यांचा समतोल राखत दीर्घकालीन विकासाला दिशा मिळणार आहे.

गडचिरोलीच्या विकासकथेतील सर्वाधिक दृश्यमान बदल म्हणजे संपर्क सुविधांचा विस्तार. पूर्वी पावसाळ्यात जगापासून तुटणाऱ्या अनेक



भागांना बारमाही रस्ते आणि पूल जोडत आहेत. दिना नदीवरील उच्चस्तरीय पूल पूर्ण झाला असून इंद्रावती, बांडिया, पर्लकोटा आणि गुंडेनूर नद्यांवरील मोठ्या पुलांची उभारणीही सुरू आहे. चामोर्शीमुलचेरा अहेरी, पारवाकोरची, शंकरपूरगुरनोली, अहेरीसिरोंचा यांसारख्या महत्त्वाच्या मार्गांची सुधारणा होत आहे. औद्योगिक व खनिज वाहतुकीसाठी मंजूर नवेगाव मोरेकोनसरीसुरजागड सुमारे ८६ किलोमीटर मार्ग, तसेच सुमारे ९४ किलोमीटरचा भंडारागडचिरोली समृद्धी महामार्ग जिल्ह्याच्या आर्थिक दळणवळणासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

वडसा गडचिरोली सुमारे ५२.६८ किलोमीटर ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पामुळे गडचिरोली शहर थेट रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. गोंदिया बल्लारशाह रेल्वेमार्ग दुहेरीकरण तसेच गडचिरोली भानुप्रतापपूर आणि गडचिरोली भाचेली प्रस्तावित रेल्वे संपर्कामुळे भविष्यात औद्योगिक व व्यापारी जोडणी आणखी मजबूत होईल. ग्रीनफिल्ड विमानतळाच्या नियोजनालाही चालना मिळत आहे. भौतिक संपर्कासोबत डिजिटल दरीही कमी होत आहे. विविध योजनांतर्गत ५०० हून अधिक मोबाईल टॉवर्स कार्यान्वित झाले असून भारतनेटच्या विस्तारामुळे ई-गव्हर्नन्स, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन शिक्षण, टेलिमेडिसिन आणि शासकीय ई-सेवा दुर्गम भागांपर्यंत पोहोचत आहेत.

सुरजागडसह जिल्ह्यातील विपुल लोहखनिज साठ्यांमुळे गडचिरोली देशातील प्रमुख एकात्मिक पोलाद उत्पादन केंद्र म्हणून आकार घेत आहे. पोलाद क्षेत्रात सुमारे तीन लाख कोटी रुपयांपर्यंत संभाव्य गुंतवणुकीची क्षमता व्यक्त करण्यात आली आहे. या उद्योगांभोवती पूरक लघु-मध्यम उद्योग, लॉजिस्टिक्स, वाहतूक, दुरुस्ती, सेवा आणि स्थानिक पुरवठा साखळी निर्माण होण्याची मोठी क्षमता आहे. त्यामुळे औद्योगिकीकरणाचा केंद्रबिंदू केवळ खनिज उत्खनन न राहता स्थानिक रोजगार, कौशल्य विकास, उद्योजकता आणि मूल्यवर्धित उत्पादन हा बनत आहे.

खनिज प्रतिष्ठानमध्ये संकलित झालेल्या १,०२४ कोटी रुपयांहून अधिक निधीतून ५४८ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे १,६०० हून अधिक प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य, शिक्षण आणि उपजीविका यांसारख्या उच्च प्राधान्य क्षेत्रांवर ६५ टक्क्यांपेक्षा अधिक निधी केंद्रित करण्यात येत आहे. भूमीतून मिळणारी खनिज संपत्ती नागरिकांच्या जीवनमान उन्नतीसाठी वापरण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणाचा लाभ स्थानिक युवकांना मिळावा यासाठी कौशल्य विकासाला रोजगाराशी जोडण्यात येत आहे. CIIIT, HCLTechच्या 'Earn While You Learn', महिंद्रा अँड महिंद्राच्या ट्रॅक्टर सर्व्हिस मेकॅनिक प्रशिक्षणासह 'NAVYA' अंतर्गत महिला व युवतींसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण राबविण्यात येत आहे. खाणकाम, यंत्रसामग्री, बांबू व वनोपज प्रक्रिया आणि कृषीपूरक व्यवसायांतील प्रशिक्षणातून स्थानिक रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी विस्तारत आहेत.

ग्रामीण विकासासाठी जलसुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. जलयुक्त शिवार २.० आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत ६,०१५ जलसंधारण कामे पूर्ण झाली आहेत. घरगुती पाणीपुरवठ्याच्या १,०८२ योजनांपैकी १,०५१ योजना पूर्ण झाल्या असून २,०४९ गावे व वस्त्यांपैकी १,७५९ ठिकाणी घरगुती नळजोडणीचे उद्दिष्ट साध्य झाले आहे. ९३६ गावे 'हर घर जल' म्हणून घोषित करण्यात आली आहेत.

भौतिक व औद्योगिक विकासाबरोबर मानवी विकासाला केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. गडचिरोली येथे १०० MBBS प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्याने आरोग्य व्यवस्थेला दीर्घकालीन बळ मिळाले आहे. अहेरी येथे १०० खाटांचे स्त्री व नवजात अर्भक रुग्णालय सुरू झाले आहे. दुर्गम भागातील गर्भवती महिलांसाठी 'माहेर घर', डिजिटल डिस्पेन्सरी आणि फिरती रक्तसंकलन वाहने यांसारख्या उपक्रमांमुळे आरोग्यसेवा अधिक जवळ पोहोचत आहे.

शिक्षण क्षेत्रात इंटरॅक्टिव्ह बोर्ड, संगणक लॅब, डिजिटल भाषा प्रयोगशाळा, रोबोटिक्स, ग्रंथालय आणि आधुनिक सुविधा विकसित होत आहेत. PM SHRI अंतर्गत २४ शाळांमध्ये शैक्षणिक सुविधा वाढविण्यात येत आहेत. गोंडवाना विद्यापीठ आणि ऑस्ट्रेलियातील कर्टिन युनिव्हर्सिटी यांच्या सहकार्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाच्या शिक्षण व संशोधनाशी जोडण्याची नवी दिशा खुली होत आहे.

आदिवासी समाजाच्या पारंपरिक 'गोटूल' संस्थेची सांस्कृतिक भूमिका जपत काही ठिकाणी त्यांना डिजिटल ग्रंथालय, संगणक सुविधा आणि करिअर मार्गदर्शनाशी जोडून आधुनिक ज्ञानकेंद्रांच्या स्वरूपात विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महिला बचत गटांना कौशल्य, वित्तीय सहाय्य आणि बाजारपेठेची जोड देऊन विविध व्यवसायांच्या माध्यमातून 'लखपती दीदी' बनविण्याच्या दिशेनेही प्रयत्न सुरू आहेत.

गडचिरोलीची विकासक्षमता केवळ खनिजांपुरती मर्यादित नाही. विशाल वनक्षेत्र, वन्यजीव, नद्या, जैवविविधता, आदिवासी संस्कृती आणि ऐतिहासिक वारसा यांमध्ये पर्यटन व रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. गुरवळा निसर्ग सफारी, कमलापूर हत्ती कॅम्प, टिपागड, बिनागुंडा धबधबा, भामरागड त्रिवेणी संगम, वडधाम फॉसिल पार्क आणि ऐतिहासिक मार्कंडा मंदिर ही स्थळे जिल्ह्याच्या पर्यटनाला नवी ओळख देऊ शकतात. गडचिरोलीच्या उच्च दर्जाच्या सागवानानेही जिल्ह्याची प्रतिष्ठा देशपातळीवर पोहोचविली आहे. आलापल्ली येथून अयोध्येतील श्रीराम मंदिर, नवीन संसद भवन, उपराष्ट्रपती भवन आणि इतर राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी उच्च दर्जाच्या सागवानाचा पुरवठा करण्यात आला. खनिजांइतकीच वनसंपदाही जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेची आणि अस्मितेची महत्त्वाची ताकद आहे.

गडचिरोलीच्या विकासाची खरी कसोटी केवळ किती रस्ते, पूल किंवा उद्योग उभे राहिले यावर नाही, तर या विकासामुळे स्थानिक व आदिवासी समाजाच्या जीवनात किती सकारात्मक बदल झाला, यावर ठरणार आहे. म्हणूनच 'जल, जंगल आणि जमीन' यांचे संरक्षण करत वृक्षलागवड, वनहक्क, बांबू व लघुवनोपजावर आधारित उपजीविका, पर्यावरणपूरक उद्योग आणि निसर्गपर्यटन यांच्या माध्यमातून स्थानिक आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षांत गडचिरोलीने संघर्षातून विकासाकडे ऐतिहासिक वाटचाल केली आहे. सुरक्षित वातावरण, दुर्गम भागांपर्यंत वाढलेली प्रशासनाची पोहोच आणि लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा वाढता सहभाग यांनी या परिवर्तनाचा पाया मजबूत केला आहे. आता या पायावर उद्योग, रस्ते, रेल्वे, डिजिटल कनेक्टिव्हिटी, जलसुरक्षा, आरोग्य, शिक्षण आणि कौशल्य विकासाची नवी व्यवस्था उभी राहत आहे.

२६ ऑगस्ट १९८२ रोजी सुरू झालेल्या गडचिरोली जिल्ह्याच्या प्रशासकीय प्रवासाला आता नक्षलोत्तर विकासाचा नवा आयाम मिळाला आहे. त्यामुळे जिल्ह्याचा वर्धापन दिन हा केवळ जिल्हानिर्मितीच्या इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस नसून शांततामय, सक्षम, आत्मनिर्भर आणि विकसित गडचिरोली घडविण्याचा संकल्प अधिक दृढ करण्याचा दिवस आहे. आजचा गडचिरोली केवळ बदलणारा गडचिरोली नाही; हा नवा गडचिरोली आहे. समृद्धीच्या नव्या क्षितिजांकडे झेपावणारा गडचिरोली.

**-गजानन जाधव,**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

# ताम्हिणी घाट ठरतोय गुन्हेगारीचा हॉटस्पॉट; सहा महिन्यांत दोन हत्या

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड आणि पुणे जिल्ह्याला जोडणाऱ्या निसर्गरम्य ताम्हिणी घाटात गेल्या सहा महिन्यांत दोन हत्यांच्या घटना घडल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जानेवारीत २५ वर्षीय तरुणाच्या हत्येनंतर ऑगस्टमध्ये ३० वर्षीय तरुणीची हत्या झाल्याने घाटातील प्रवासाबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



माणगाव–पुणे हा मार्ग कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. गेल्या २५ वर्षांपासून या मार्गामुळे दोन्ही भागातील प्रवास सुलभ झाला आहे. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याने कोकणातील विद्यार्थी आणि पालक मोठ्या प्रमाणात या मार्गाचा वापर करतात. वाढत्या वाहतुकीमुळे स्थानिक व्यवसाय आणि रोजगारालाही चालना मिळाली आहे.पावसाळ्यात ताम्हिणी घाटाचे रूप स्वर्गीय असते. उंच कड्यांवरून कोसळणारे धबधबे, धुक्यात हरवलेले डोंगर, खोल दऱ्यांतील हिरवाई आणि वळणावळणाचा रस्ता पर्यटकांना भुरळ घालतो. त्यामुळे पावसाळ्यात येथे पर्यटकांची मोठी गर्दी होते.मात्र याच घनदाट जंगलाची दुसरी बाजू गंभीर आहे. दिवसा वर्दळ असली तरी रात्री या मार्गावर शुकशुकाट असतो.

घनदाट जंगल, अंधार, निर्जन भाग आणि मोबाईल नेटवर्कच्या मर्यादांमुळे अनुचित घटना घडल्यास तातडीने मदत मिळणे कठीण होते. या पार्श्वभूमीवर घाटात पोलिसांची नियमित गस्त आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पूर्वी पुणे–रायगड हद्दीत कोंडेथर गावाजवळ पोलिसांचे चेकपोस्ट होते. सध्या तेथे नियमित उपस्थिती नसल्याने वाहनांची तपासणी आणि देखरेख कमी झाल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी कोंडेथर येथील चेकपोस्ट पुन्हा सुरू करावे, अशी मागणी होत आहे. रायगड आणि पुणे पोलिसांनी संयुक्त गस्त व्यवस्था निर्माण करावी, अशीही मागणी आहे.

ताम्हिणी घाट अपघाताच्या दृष्टीनेही संवेदनशील आहे. तीव्र वळणे, उतार, निसरडे रस्ते आणि धुके यामुळे अपघाताचा धोका कायम आहे. अशावेळी नियमित गस्त असल्यास जखमींना तातडीने मदत मिळू शकते.

महिला प्रवासी, विद्यार्थिनी आणि कुटुंबासह प्रवास करणाऱ्या पर्यटकांना रात्रीच्या वेळी असुरक्षित वाटते. त्यामुळे संवेदनशील ठिकाणी गस्त, सीसीटीव्ही आणि मदत केंद्रे उभारण्याची गरज आहे.

## कर्जत रेल्वे स्थानकात कोयना एक्स्प्रेसमध्ये धुरामुळे खळबळ

**नेरळ : प्रतिनिधी**

कोल्हापूर–मुंबई कोयना एक्स्प्रेसच्या शेवटच्या डब्याजवळ अचानक मोठ्या प्रमाणात धूर निघाल्याने शनिवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कर्जत रेल्वे स्थानकात एकच खळबळ उडाली.

आग लागल्याच्या भीतीने प्रवाशांनी लहान मुले आणि सामानासह रुळावर उड्या मारत स्थानकाकडे धाव घेतली. कोल्हापूरहून मुंबईकडे जाणारी कोयना एक्स्प्रेस लोणावळा–खंडाळा घाट पार करून कर्जत स्थानकातील फलाट क्रमांक १ व २ मधील मार्गावरून वेगाने जात असताना जनरल डब्याचे चाक जाम होऊन ठिणग्या आणि धूर निघत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे एक्स्प्रेस थांबवण्यात आली. रेल्वे विभागाने स्पष्ट केले की, आग लागली नव्हती. ब्रेक लायनर गरम झाल्याने धूर निर्माण झाला होता. रेल्वे कर्मचारी, जीआरपी आणि आरपीएफने फायर एक्स्टिंग्विशरचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

सुमारे १५ मिनिटांनंतर गाडी मुंबईकडे रवाना झाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, त्याचवेळी प्रवासी गाडी येण्याची घोषणा सुरू असल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

रेल्वे सुरक्षा नियमांनुसार घाट विभागातून येणाऱ्या गाड्यांच्या ब्रेक सिस्टिमची तपासणी केली जाते. लोणावळा ते कर्जत हा घाट विभाग असून, येथे गाड्यांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रेकचा अधिक वापर होतो. त्यामुळे ब्रेक ब्लॉक गरम होऊन धूर निघण्याच्या घटना यापूर्वीदेखील घडल्या आहेत.

## आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते खानाव येथील नूतन पुलाचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील खानाव येथील मुख्य रस्त्यावरील साकव पुलाच्या कामाचा शुभारंभ आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. पावसाळ्यात खानाव येथील साकव पुलाला भगदाड पडल्याने अलिबाग–रोहा वाहतूक ठप्प झाली होती. वाहतूक गावातील अंतर्गत रस्त्याने वळविल्याने ताण वाढला होता. ग्रामस्थांच्या सहकार्याने आणि जि. प. सदस्य अनंत गोंधळी यांच्या पाठपुराव्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुलाचे काम पूर्ण झाले, असे आमदार दळवी यांनी सांगितले.



लोकांची गैरसोय झाल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करत यापुढे अशी वेळ येणार नाही याची काळजी घेऊ, असेही ते म्हणाले. यावेळी जि. प. सदस्य अनंत गोंधळी, पं. स. सदस्य संतोष निगडे, सुरेश म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र गोंधळी, ग्रामस्थ, शिवसेना कार्यकर्ते आणि ठेकेदार संदेश पाटील उपस्थित होते. अनंत गोंधळी यांनी आमदार दळवी यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

गोंधळी म्हणाले, विरोधक टीका करणारच त्याकडे लक्ष न देता लोकोपयोगी कामे करत राहणार. ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे काम जलद झाले. नवीन साकव पुलावरून दुचाकी आणि लहान चारचाकी वाहतूक सुरू करण्यात आली असून उर्वरित काम लवकरच पूर्ण होईल, असे सांगण्यात आले.

## कोयना समाजाच्या 'श्रावणसरी'ची धूम; महिलांचा उदंड प्रतिसाद

**चौक : प्रतिनिधी**

कोयना क्षत्रिय मराठा समाज सेवा संघाच्या वतीने समाजातील महिला भगिनींसाठी अध्यक्ष अरुण साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली 'श्रावणसरी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिला भगिनींचा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद लाभला.



कोयना प्रकल्पग्रस्त गावांमधून रायगड, ठाणे, पालघर आणि सातारा जिल्ह्यातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक गावातील महिलांनी पारंपरिक गीते, नृत्य, वादन आणि सांस्कृतिक सादरीकरणातून आपल्या कला, संस्कृती आणि परंपरेचे सुंदर दर्शन घडवले. या आकर्षक सादरीकरणामुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कोयना प्रकल्पग्रस्तांना स्थलांतर होऊन ६७ वर्षे पूर्ण झाली तरीही आपली कला आणि परंपरा आजही जपली जात असल्याचे या सोहळ्यातून दिसून आले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक जय भवानी महिला मंडळ, करंजावडे–धरणाकॅम्प (रायगड), द्वितीय क्रमांक केदारनाथ महाकाली महिला मंडळ, कोयना वेळे (रायगड) आणि तृतीय क्रमांक रोहिणे महिला मंडळ, रोहिणे–आनंगाव (ठाणे) यांनी पटकावला. उत्तेजनार्थ पारितोषिके जिजामाता महिला मंडळ, रानसई–उचाट आणि जय भवानी महिला मंडळ, कोयना जांब्रुक यांना मिळाली. सर्वोत्कृष्ट नृत्यांगना म्हणून कुमारी आसावरी साळुंखे (ठाणे), उत्कृष्ट गायनासाठी नम्रता कदम आणि उत्कृष्ट वादनासाठी कुमार शौर्य कदम (दोघे करंजावडे) यांना गौरविण्यात आले.

गाणी सादरीकरणासाठी राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ यांचा सन्मान करण्यात आला. 'नशिब पैठणीचे' च्या दहा भाग्यवान विजेत्यांना पैठणी देऊन गौरवण्यात आले. कोयना प्रकल्पग्रस्त संस्थांचे प्रमुख, नगरसेवक, आजी–माजी पदाधिकारी व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

## द. ग. तटकरे महाविद्यालयात ग्रंथालय परिचय कार्यक्रम उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने दि. १३ ते १९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'ग्रंथालय परिचय कार्यक्रम' (Library Orientation Programme) उत्साहात संपन्न झाला.



माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. आर. पांडेय, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एस्सी. आय.टी., बी.एम.एस. आणि बी.ए.एफ. या सर्व शाखांमधील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची रचना, वेळापत्रक, नियमावली तसेच ग्रंथालयामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सेवा व सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, पाठ्यपुस्तके, कथा, कादंबऱ्या, नाटके, काव्यसंग्रह, आध्यात्मिक पुस्तके, स्पर्धा परीक्षांची पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, जर्नल्स, बुक बँक, सी.डी., विश्वकोश, शब्दकोश, प्रकल्प साहित्य, प्रश्नपत्रिका, अभ्यासक्रम, वर्तमानपत्रांची कात्रणे, बाँड व्हॉल्यूम, ई–बुक्स व ई–जर्नल्स आदी वाचनसाहित्याची माहिती देण्यात आली. महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील उपलब्ध वाचनसाहित्य, सेवा–सुविधा आणि त्यांचा शैक्षणिक उपयोग याबाबत योग्य माहिती मिळावी तसेच विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा नियमित, प्रभावी आणि जास्तीत जास्त उपयोग करून आपल्या ज्ञानात भर घालावी, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

दरम्यान, सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयाबद्दलची जागरूकता वाढून नियमित वाचनाची सवय आणि ग्रंथालयाचा प्रभावी वापर करण्याची प्रेरणा निर्माण झाली.

## आशा वर्कर्सची निराशा शासनदरबारी मांडणार –आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात आरोग्याशी संबंधित समस्यांसाठी आशा वर्कर्स महत्वाची कामगिरी बजावतात. कोरोनात जीवाची पर्वा न करता आशा वर्कर्सने मोलाचे काम केल पण तरीही अपुरे मानधन व कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणींचा सामना करत असतात. त्यांच्या निराशा शासन दरबारी मांडून न्याय देणार, असे आश्वासन आमदार महेंद्र थोरवे यांनी दिले.

कर्जतच्या आशा वर्कर्स महत्वाच्या मागण्या घेऊन बाळासाहेब भवनमध्ये आल्या होत्या. त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांना राख्या बांधून बहीण – भावाचे नाते निभावले. आमचा भाऊ आमच्या प्रश्नासाठी लढतोय, असे म्हणत कौतुक केले.



## सैनिकांसाठी विद्यार्थ्यांनी बनवल्या आकर्षक राख्या

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिप आदर्श शाळा नवघर येथील विद्यार्थ्यांनी भारतीय सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आकर्षक व कमी खर्चातील राख्या स्वतः तयार करून अनोखा देशभक्तीपर उपक्रम राबविला. शाळेतील विषय शिक्षिका वृषाली गुरव, रुपाली लेंडवे तसेच श्रद्धा सुतार यांनी विद्यार्थ्यांसाठी राखी बनविण्याची कार्यशाळा घेतली.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी कल्पकतेने विविध आकर्षक राख्या तयार केल्या. उपक्रमामागील भावना स्पष्ट करताना उपशिक्षक राजेंद्र अंबिके यांनी भारतीय सैनिक देशाच्या सुरक्षेसाठी सीमेवर अहोरात्र कार्यरत असतात. त्यामुळे त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी राखी तयार करून ती वेळेत सैनिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या २५ ऑगस्ट रोजी जनरल मॅनेजर, एनएडी, ट्रॉम्बे यांच्या पत्त्यावर शिक्षक व विद्यार्थ्यांच्या माध्यमातून अधिकृतरीत्या स्पीड पोस्टने पाठविण्यात आल्या.

राख्यांसोबत शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर यांनी भारतीय सैनिकांसाठी शुभेच्छा व कृतज्ञतेचा संदेशही पाठविला. कमी खर्चात उपलब्ध साहित्याचा कल्पक वापर करून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या राख्यांमधून 'सैनिकांप्रति कृतज्ञता आणि देशभक्ती' हा संदेश प्रभावीपणे दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी, देशप्रेम आणि सैनिकांविषयी आदराची भावना रुजण्यास मदत झाली.



## तटरक्षकच्या जवानांसोबत जिंदल विद्या मंदिरच्या विद्यार्थिनींचे रक्षाबंधन



**मुरूड : प्रतिनिधी**

देशाच्या सागरी सीमांचे रक्षण करणाऱ्या भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांच्या मनगटावर राखी बांधत जिंदल विद्या मंदिर, साळावच्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधन अनोख्या पद्धतीने साजरे केले. या विशेष उपक्रमाची सुरुवात तटरक्षक दलाचे शौर्य आणि राष्ट्रसेवेची झलक दाखवणाऱ्या चित्रफितीने झाली.

सागरी सीमेवर अहोरात्र कार्यरत असलेल्या जवानांचे समर्पण पाहून विद्यार्थिनींमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली. यानंतर १७ विद्यार्थिनींनी अधिकाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या राष्ट्रसेवेला सलाम केला. इयत्ता आठवीची विद्यार्थिनी सामिया उल्डे हिने अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांचे अनुभव जाणून घेतले. या उपक्रमातून 'देशाचे रक्षण करणाऱ्या हातांप्रति कृतज्ञता' हा संदेश देण्यात आला.

तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांनीही या पुढाकाराचे कौतुक केले. या उपक्रमाला प्राचार्य मुकेश ठाकूर यांचे मार्गदर्शन, उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे नियोजन सहशालेय उपक्रम प्रमुख अफी बाशा यांनी केले, तर चित्रफितीसाठी नृत्य शिक्षक दिनेश कानुगोजे यांचे योगदान लाभले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

मौजे चिंचवली तर्फे दिवाळी, ता.रोहा, जि.रायगड येथिल......

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| १) नंदकुमार सदाशिव रामसिंग<br>२) अपर्णा सुनिल उपाध्ये उर्फ अपर्णा सदाशिव नेने | ३५२/१/ब | जिरायत००–९६–००<br>पो.ख. ००–००–००<br>एकुण ००–९६–००<br>पैकी लिहून देणार यांच्या ०–७६–० क्षेत्रापैकी ०–१७–०० एवढे क्षेत्र | ०.८०<br>०.६३ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (३०) तिस दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.३०/०८/२०२६

सही/–
अॅड.पी.जी.दाभाडे
रा. फ्लॅट नं.४०२, बी.वींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे हॉस्पिटल जवळ, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं.९२७२७१३९५६

# नवी मुंबईत रक्षाबंधनाचा उत्सव साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

लहानपणीच्या भांडणांपासून ते आयुष्याच्या प्रत्येक वळणावर एकमेकांच्या पाठीशी उभं राहण्यापर्यंत भाऊ-बहिणीचं नातं हे शब्दांपलीकडचं असतं. या नात्यात कधी रुसवा असतो, कधी गोडवा; कधी चिडवाचिडवी असते, तर कधी न बोलताही मनातील भावना समजून घेणारी हक्काची साथ असते. याच अतूट नात्याचा उत्सव असलेला रक्षाबंधनाचा सण आज सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे.

बहिणीच्या हातातील राखीचा एक छोटासा धागा दिसायला साधा असला, तरी त्यात बालपणीच्या असंख्य आठवणी, प्रेम, विश्वास, काळजी आणि आयुष्यभराची साथ गुंफलेली असते. भाऊ कितीही मोठा झाला, कितीही दूर गेला, तरी बहिणीच्या हातून बांधली जाणारी राखी त्याला पुन्हा त्या जुन्या आठवणींच्या विश्वात घेऊन जाते. कधी



आईच्या ओरडीत एकमेकांना वाचवणं, या आठवणी आज पुन्हा डोळ्यांसमोर उभ्या राहतात. काळ बदलतो, घरं बदलतात, जबाबदाऱ्या वाढतात; मात्र भाऊ-बहिणीच्या नात्यातील हक्क आणि माया मात्र तशीच राहते.

आज अनेक बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतील. भाऊही बहिणीला तिच्या स्वप्नांच्या वाटेवर सदैव साथ देण्याचं आश्वासन देईल. मात्र आजच्या काळात 'रक्षण' या शब्दाचा अर्थही बदलला आहे. बहिणीच्या स्वप्नांचे, तिच्या स्वातंत्र्याचे आणि तिच्या आत्मविश्वासाचे रक्षण करणं, तिच्या प्रत्येक निर्णयात तिच्या पाठीशी उभं राहणं, हाच खऱ्या अर्थाने रक्षाबंधनाचा संदेश ठरतो.

काही बहिणींचे भाऊ नोकरी, शिक्षण किंवा व्यवसायामुळे दूर आहेत. काहींच्या मनगटावर आज राखी बांधण्यासाठी भाऊच नाहीत; तर काही भाऊ आपल्या बहिणीपासून दूरदेशी आहेत. अशावेळी मोबाईलच्या पडद्यावर दिसणारा चेहरा, व्हिडिओ कॉलवर ऐकू येणारा आवाज किंवा कुरिअरने आलेली राखीही मनातील अंतर कमी करून जाते. नवी मुंबईतील कुटुंबांमध्ये रक्षाबंधनाच्या निमित्ताने प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकीचा रंग पाहायला मिळाला. बहिणीच्या हातातील राखी आणि भावाच्या चेहऱ्यावरील आनंदाने अनेक घरांमध्ये बालपणीच्या आठवणी पुन्हा उजळल्या.



## नेरूळ पोलीस ठाण्यात विशेष मुलांनी बनवलेल्या राख्यांनी रक्षाबंधन

**नवी मुंबई : बातमीदार**

यंदाच्या रक्षाबंधनानिमित्त नेरूळ येथील स्वरसागर फाउंडेशनतर्फे विशेष उपक्रम साजर करण्यात आला. पेण तालुक्यातील विशेष मुलांना तयार केलेल्या राख्या खरेदी करून, या राख्या स्वरसागर फाउंडेशनच्यावतीने पोलिसांना बांधण्यात आल्या. यावेळी स्वरसागर फाऊंडेशनतर्फे अनेक भगिनीनि नेरूळ पोलिस ठाण्यात जात प्रत्येक पोलिसाला ओवाळत राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

विशेष मुलांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्या आहेत. याबाबतची माहिती समजल्यावर आम्ही त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी तयार केलेल्या सुंदर राख्या आम्ही खरेदी केल्या. २४ तास नागरिकांची सुरक्षा राखणाऱ्या नेरुळ पोलीस स्टेशनमधील पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन साजरे केले.त्यामुळे विशेष मुलांच्या कलागुणांना देखील वाव मिळाला व पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करता आली असे स्वरसागर फाउंडेशनच्या सदस्यांनी सांगितले.

## रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून एचपीव्ही लसीकरणाचे आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नमुंमपा कार्यक्षेत्रात १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींसाठी HPV लसीकरण कार्यक्रम दि. १० मार्च २०२६ पासून राबविण्यात येत आहे. HPV लसीकरणाचे काम वाढविण्यासाठी रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून व HPV लसीकरणामुळे लाभार्थींचे जीवघेण्या आजारापासून होणारे संरक्षण विचारात घेऊन दि. २७ ऑगस्ट, २०२६ रोजी HPV विशेष लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर विशेष HPV लसीकरण कार्यक्रमाच्या अनुषंगानेः ANM व आशा कार्यकर्ती यांनी कार्यक्षेत्रात गृहभेटी देऊन मोहिमेबद्दल माहिती दिली. ना. प्रा. आ. केंद्र बाह्य रुग्ण विभाग तसेच नियमित लसीकरण सत्रामध्ये मोहिमेची व्यापक प्रसिद्धी करण्यात आली.यामध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची जीवघेणी व्याप्ती पालकांच्या निदर्शनास आणून दिली. यानुसार HPV लसीकरण सत्राचे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आयोजन करण्यात आले.



याव्यतिरिक्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालये येथे दैनंदिन HPV लसीकरण सत्र सुरू असून HPV लस मोफत उपलब्ध आहे.आपल्या १४ वर्षे पूर्ण केलेल्या व १५ वर्षे पूर्ण न केलेल्या वयोगटातील प्रत्येक मुलीला एचपीव्ही लस देऊन गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगा पासून संरक्षित करण्याचे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## गव्हाण विद्यालयात मार्गदर्शिका व प्रश्नपत्रिका संच भेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण-कोपर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यालयाला शैक्षणिकसाहित्य भेट देण्याच्या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना विविध स्पर्धापरीक्षांची तयारी करण्यासाठी आवश्यक असलेले प्रश्नपत्रिका संच, मार्गदर्शिका व इतर शैक्षणिक साहित्यवाढदिवस असणाऱ्या सेवकांनी विद्यालयास भेट म्हणून द्यावे, असे आवाहन विद्यालयाच्या प्राचार्या सौ.ज्योत्स्ना ठाकूर मॅडम यांनी केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत विद्यालयातील सेवकांनीहा उपक्रम पुढे सुरू ठेवला आहे.



गुरुवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून विद्यालयाचेउपमुख्याध्यापक. विलासराव लेंभे तसेच शितलकुमार म्हात्रे आणि गीतांजली म्हात्रे यांनी आपल्या मुलीच्या ईशान्याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीमहत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेच्या प्रत्येकी चार प्रश्नपत्रिका संचांप्रमाणे

एकूण आठ प्रश्नपत्रिका संच विद्यालयास भेट दिले.तसेच विद्यालयाच्या विज्ञान शिक्षिका रंजीता पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उपयुक्त असे प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या तयारीकरिता चालू घडामोडींचे पुस्तक संच, इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षामार्गदर्शिका तसेच पाच फुलझाडांची रोपे विद्यालयास भेट म्हणून दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांनास्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक संदर्भसाहित्य उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबरविद्यालय परिसर अधिक हिरवाईने नटण्यासही हातभार लागणार आहे.

या प्रसंगी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन अरुणशेठ भगत, स्कूलकमिटीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी विजय शेठ घरत, प्राचार्या.ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे , पर्यवेक्षिका शशिकला पाटील मॅडम,प्रा. संजय उगले, सुहास भगत तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

मान्यवरांच्याउपस्थितीत सदर शैक्षणिक साहित्य विद्यालयाच्या वतीने स्वीकारण्यात आले.यावेळी स्कूल कमिटीचचेअरमन अरुणशेठ भगत यांनी विद्यालयातील सर्व सेवकांचे कौतुक केले. तसेच प्राचार्या.ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी सुरू केलेल्या या अभिनव उपक्रमाचे विशेषअभिनंदन केले.

## फुंडे विद्यालयात रक्षाबंधन व वृक्षबंधन उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात नारळी पौर्णिमा व रक्षाबंधन यासणाचे औचित्य साधून राखी बनवणे, राखी प्रदर्शन, वृक्षबंधन, नृत्य अशा विविध उपक्रमांना विदयार्थ्यांकडूनउदंड प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन. पाटील यांनी केले. पर्यावरणाचे संवर्धन काळाची गरज आहे. साऱ्या सजीव सृष्टीचा आधार पर्यावरण आहे, वृक्ष जगले तरआपले जीवन सुखी होईल.त्या मुळे वृक्षांनाच भाऊ मानून राखी बांधण्याचा अनोखा उपक्रम विद्यालयातसंपन्न झाला.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी.बी. साळुंखे , उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिकाएस. एस. पाटील, योगेश पाटील, परेश पाटील, निशांत पाटील , अजय म्हात्रे , वरीष्ठ लेखनिक -नितीन म्हात्रे,नवनीत ठाकूर,सर्व सेवक वृंद व विद्यार्थी यांनी विद्यालयाच्या परीसरातील सर्व वृक्षांना राखी बांधून वृक्षबंधनसाजरे करण्यात आले.सदर कार्यक्रमात योगेश पाटील - पागोटे यांच्या कडून २५ स्पोर्ट गणवेश, प्रकाश कडू-न्हावे खाडी यांच्या कडून१३ स्पोर्ट गणवेश तसेच अजय म्हात्रे -सोनारी यांच्या कडून १२ स्पोर्ट गणवेश ज्युनिअर व माध्यमिकच्याविदयार्थ्यांना देण्यात आले.

विशेष सहकार्य लेखनिक नवनीत ठाकूर, क्रीडा शिक्षक डी.डी. पाटील यांचे लाभले. प्रसंगी राखी बनवणे, राखी प्रदर्शन तसेचकोळी नृत्याच सादरीकरण करण्यात आले. विशेष मार्गदर्शन कला शिक्षक एन. के. पाटील यांचे लाभले. सर्ववर्ग शिक्षकांच्या मार्गदर्शना खाली रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. इयत्ता ९ वी चे वर्ग शिक्षकएस. डी. म्हात्रे यांच्या समवेत विदयार्थ्यांनी कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते.

## एम.एन.एम. विद्यालयाचा जीवनविद्या संस्कार शिक्षण अभियानामध्ये सहभाग

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्यामध्ये संस्कार, सद्विचार, नैतिक मूल्ये आणि सकारात्मक जीवनदृष्टी रुजविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'जीवनविद्या संस्कार शिक्षण अभियान २०२६-२७' या उपक्रमात एम.एन.एम. विद्यालयाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी, शिस्त, आत्मविश्वास, सकारात्मक विचारसरणी आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांची आणि संस्कारांची शिदोरी मिळावी, या उद्देशाने विद्यालयाने या उपक्रमात सहभाग घेतला आहे.

यावेळी जीवनविद्या मिशनचे



प्रतिनिधी श्री. भास्कर पोखरकर यांनी अभियानाबाबत मार्गदर्शन केले. तसेच जे.बी.एस.पी. संस्थेचे स्टेट बोर्ड इन्स्पेक्टर चौहान सर यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी या अभियानाचा सकारात्मक उपयोग करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पर्यवेक्षक अरुण जोशी सर आणि पर्यवेक्षिका प्रणिता गोले मॅडम यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही या अभियानासाठी सहकार्य केले.

'शिक्षणासोबत संस्कार आणि ज्ञानासोबत जीवनमूल्ये' हा संदेश देणाऱ्या या अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चितच नवी दिशा मिळणार असून, विद्यालयाच्या या सहभागाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## आज विष्णुदास भावे नाट्यगृहात महिला मेळाव्यासह मंगळागौर स्पर्धा पारितोषिक वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिलांकरिता रविवार, दि. ३० ऑगस्ट, २०२६ रोजी, सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वा. या वेळेत वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृह, येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मंगळागौर स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी ३२ महिला समुहांतून १० समुहांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आलेली आहे. या अंतिम फेरीत निवड झालेल्या १० महिला समुहांचे सादरीकरण सकाळी ९.०० वा. पासून सुरू होणार असून दुपारी १२.०० वा. त्याचा पारितोषिक वितरण सोहळा महिला मेळाव्याच्या मुख्य समारंभात संपन्न होणार आहे.

विशेष म्हणजे महिला मेळाव्यानिमित्त महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ कशी उपलब्ध करावी याबाबत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या महिला मेळाव्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभागी व्हावे असे आवाहन महिला बालकल्याण समिती सभापती सलुजा सुतार व उपसभापती रूपाली भगत आणि सर्व समिती सदस्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# उलवे पोलीस ठाण्यात विद्यार्थिनींकडून रक्षाबंधन



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात साजरा केला. इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी उलवे पोलीस ठाण्यास भेट देऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधत त्यांच्या कार्याप्रती सन्मान व कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यार्थिनींनी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या पोलिसांप्रती विद्यार्थिनींनी व्यक्त केलेला हा स्नेहभाव विशेष ठरला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पोलिसांच्या सामाजिक जबाबदारीची तसेच त्यांच्या सेवाभावी कार्याची जवळून ओळख झाली.

या वेळी अर्जुन रजाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उलवे पोलीस ठाणे, तसेच अजित कणसे (API), वामन बरफ (PSI), शीतल साठे (PSI), अशोक साळवे (ASI), जयवंत पगारे (ASI), जान्हवी गावित (WHC), उमाकांत गोलवड (पोलीस नाईक), सुवर्णा बोचरे, अनिता डोंगरे, मयूर पाटील, श्री. पंकज परदेशी, श्री. सागर पाटील आणि श्री. विश्वनाथ पाटील उपस्थित होते. तसेच अग्निशमन दलाचे श्री. प्रतीक शिंदे यांचीही उपस्थिती लाभली.

दरम्यान, विद्यालयात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शाळेच्या दैनंदिन कामकाजात शिक्षकेतर कर्मचारी देत असलेल्या मोलाच्या सहकार्याची जाणीव ठेवत विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रती आदर, स्नेह आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या उपक्रमामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

## पळस्पे येथील बांधकाम साईटवरून ॲल्युमिनियम प्लेटची चोरी; दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पळस्पे परिसरातील बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणाहून ॲल्युमिनियम धातूच्या प्लेटची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीच्या ६ ॲल्युमिनियम प्लेट असा सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पळस्पे गावातील आर-०९ या बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या समोरील भागातून ॲल्युमिनियम धातूच्या एकूण १० प्लेट चोरीला गेल्या. या चोरीच्या मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १ लाख रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वपोनि बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अभिजित पाटील, पोहवा अविनाश गंथडे, अमोल पाटील, पोना मिथुन भोसले, सम्राट डाकी, सोमनाथ म्हात्रे, मपोशी सुशीला संवार आदींचे पथक त्या परिसरात गस्त घालीत असताना त्यांना सलमान कमाल शेख (२६) आणि संजय अशोक लाहोटी (२३) या दोघांचा संशय आल्याने त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात दिला.

## बेवारस महिलेचा मृत्यू; ओळख पटविण्यासाठी पोलिसांचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

उलवे परिसरात बेवारस अवस्थेत आढळून आलेल्या अंदाजे ५० वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. संबंधित महिलेची अद्याप ओळख पटलेली नसून, तिच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी उलवे पोलिसांनी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर महिला २६ ऑगस्ट २०२६ रोजी उलवे पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेवारस स्थितीत आढळून आली होती. तिच्या पालनपोषणासाठी तिला शील आश्रम येथे दाखल करण्यात आले होते. मात्र, तिची प्रकृती ठीक नसल्याने तिला कामोठे येथील एम.जी.एम. रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना या महिलेचा मृत्यू झाल्याचे रुग्णालयाकडून कळविण्यात आले.

मृत महिलेचे नाव अनौळखी महिला असे नमूद करण्यात आले असून, तिचा पत्ता उपलब्ध नाही. तिचे वय अंदाजे ५० वर्षे, उंची सुमारे १५० सेंटीमीटर आहे. तिच्या अंगावर सडपातळ बांधा, चेहरा उभट, काळे व सोनेरी केस आणि उजव्या भुवईवर जखमेची खूण असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तसेच तिच्या अंगावर राखाडी रंगाचा गाऊन होता.

या महिलेची ओळख पटविण्यासाठी तसेच तिच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी उलवे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस उपनिरीक्षक अंकुश म्हस्कर तपास करीत आहेत. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास उलवे पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वीर रेल्वे स्थानकावर सर्व गाड्यांना थांबा द्या!

## ५ सप्टेंबरपर्यंत अल्टीमेटम, अन्यथा ७ सप्टेंबरला रेल रोको

**महाड : प्रतिनिधी**

वीर रेल्वे स्थानकावर सर्व एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्यासह महाड-पोलादपूर परिसरातील रेल्वे प्रवाशांच्या विविध मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अन्यथा ७ सप्टेंबर २०२६ रोजी वीर रेल्वे स्थानकावर रेल रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा 'मिशन वीर रेल्वे थांबा महाड-पोलादपूर कृती समिती'चे मुख्य प्रवर्तक तथा पत्रकार मनोज खांबे यांनी दिला. मागण्या मान्य करण्यासाठी कोकण रेल्वे प्रशासनाला ५ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत खांबे यांनी आंदोलनाची घोषणा केली. यावेळी कृती समितीचे सुधीर शेठ, सुनील अग्रवाल, सतीश सकपाळ, महेंद्र मनवे, जमील सरखोत, समीर गाडगीळ, राजेंद्र मेटे, निलेश नरे, राजीव वनारसे, चंद्रकांत शिंदे, शेखर राखाडे, उदय दळवी, विशाल हाटे, सुधीर सकपाळ आदी उपस्थित होते.

प्रारंभी सुधीर शेठ यांनी वीर रेल्वे स्थानकावर गाड्यांना थांबा मिळावा यासाठी यापूर्वी हिरवळ प्रतिष्ठानचे किशोर धारिया तसेच विविध व्यक्ती



व संस्थांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. महाडचे ऐतिहासिक, पर्यटन आणि औद्योगिक महत्त्व लक्षात घेता वीर स्थानकावर अधिकाधिक गाड्यांना थांबा मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

मनोज खांबे यांनी 'मिशन वीर रेल्वे थांबा' या लोकचळवळीच्या माध्यमातून रेल्वेमंत्री, केंद्रीय राज्यमंत्री, खासदार, रायगडचे पालकमंत्री तसेच कोकण रेल्वेच्या बेलापूर व रत्नागिरी येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती दिली.महाड-पोलादपूर परिसरातील अनेक नागरिक मुंबई, ठाणे, कल्याण तसेच गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा आणि सुरत या शहरांमध्ये नियमित प्रवास करतात. वीर स्थानकावर प्रमुख एक्स्प्रेस गाड्यांना थांबा मिळाल्यास या भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल, असे खांबे यांनी स्पष्ट केले.

'वीर रेल्वे-महाड' नामकरणाची मागणी-

वीर रेल्वे स्थानकाचा नामविस्तार करून 'वीर रेल्वे-महाड' असे नामकरण करावे, अशी मागणीही कृती समितीने केली आहे. याबाबत वीर गावच्या सरपंचांची भेट घेण्यात आली असून ग्रामपातळीवर बैठक घेऊन पुढील चर्चा करण्यात येणार असल्याचे खांबे यांनी सांगितले.

याशिवाय वीर स्थानकावर सर्व एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देणे, महाड एमआयडीसी ते पोलादपूर परिसराला जोडणारा नवीन रेल्वे फाटा उभारणे, वीर स्थानकावर सर्व एक्स्प्रेस गाड्यांच्या तिकीट बुकिंगची सुविधा सुरू करणे आणि वीर-पनवेल मेमू सेवा सुरू करणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

महाड पोस्ट कार्यालयातील बंद करण्यात आलेली रेल्वे आरक्षण सुविधा पुन्हा सुरू करावी, अशी मागणीही कृती समितीने केलीकोकण रेल्वे मार्गावरून दररोज सुमारे २७ गाड्या धावत असतानाही वीर स्थानकावर मोजक्याच गाड्यांना थांबा मिळतो. दोन पॅसेंजर गाड्या आणि अधूनमधून एखादी एक्स्प्रेस वगळता अन्य गाड्या वीर येथे थांबत नसल्याने महाड-पोलादपूर परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

वीर रेल्वे स्थानकाला सर्व गाड्यांचा थांबा मिळेपर्यंत ही लोकचळवळ सुरूच राहणार असून, मागणी मान्य करण्यासाठी वेळप्रसंगी आक्रमक भूमिका घ्यावी लागली किंवा टोकाचे आंदोलन करावे लागले तरी मागे हटणार नाही, असा निर्धार मनोज खांबे यांनी व्यक्त केला.कृती समितीच्या विविध मागण्यांबाबत सुधीर शेठ, सतीश सकपाळ आदींनीही भूमिका मांडली. यावेळी उपस्थित पत्रकारांनी आंदोलनाबाबत विविध सूचना केल्या.

# बोरघाटात तेल वाहक टँकरला आग

**खालापूर ,खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर आज सकाळी ऑईलच्या टँकरचा ब्रेक फेल झाल्याने त्याचा अपघात झाला.

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवरून पुण्याहून मुंबई कडे जाणाऱ्यां ऑइल टँकर क्रमांक (४३ Y ७७३६ )हा ऑइल घेऊन जातं असताना तो ढेकू गावच्या हद्दीत आला असता टँकरचे अचानक ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील एका अज्ञात वाहनाला धडक देऊन टँकर एक्सप्रेस वेच्या शोल्डर लेनवर थांबला.

या अपघातात टँकरचा चालक जखमी झाला असून त्याची प्रकृती सामान्य असल्याची माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच संबंधित सर्व यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. जखमी टँकर चालकाला लोकमान्य हॉस्पिटलच्या रुग्णवाहिकेतून एमजीएम हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले आहे. अपघातस्थळी आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स आणि महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट यांच्या पथकाकडून मदतकार्य केले



# सर्व मागण्या मंजूर झाल्याने देवा ग्रुपच्या उपोषणाची यशस्वी सांगता

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड आगारातील बससेवा सुरुळीत, सुरक्षित व सक्षम करण्यासाठी मुरुड-जंजिरा तालुक्यातील नागरिकांच्या न्याय्य मागण्यांसाठी देवा ग्रुपने मुरुड आगारासमोर शुक्रवारी उपोषण सुरु केले होते. मुरुड आगाराने लिखित दिल्यामुळे उपोषणकर्त्यांचे समाधान झाले असून सरबत पियुन उपोषणाची यशस्वी सांगता झाली आहे .

देवा ग्रुप फाऊंडेशनचे डॉ. अनिकेत प्रदीप मेस्त्री यांच्या सोबत देवा ग्रुप फाऊंडेशन अध्यक्ष मनोहर गुरव,उपाध्यक्ष नरेश कर्णिक,कार्याध्यक्ष महेश भगत,सचिव रुपेश जामकर,संघटक भावेश शहा नगरसेवक रुपेश रणदिवे , ऍड रुपेश पाटील ऍड कुणाल जैन , नगराध्यक्ष आराधना दांडेकर नगरसेविका प्रीता चौलकर प्रांजली मकु नगरसेवक मनोज भगत माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर कोळी समाज अध्यक्ष मनोहर मकु अरविंद गायकर युवा नेते कुणाल सतविडकर ,आदी सह असंख्य प्रवासी वर्गाच्या साक्षीने उपोषणास सुरुवात करण्यात आली .





उपोषणाचा पहिलाच दिवस असताना एसटी महामंडळाकडून चर्चा करण्यासाठी रामवाडी पेण येथून विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पाटील व मुरुड आगारप्रमुख चिन्मय आंबवकर हे उपस्थित होते .त्यांनी देवा ग्रुप फाऊंडेशनचे डॉ. अनिकेत मेस्त्री व त्यांच्या सोबत असणाऱ्या सर्व सहकारी यांची भेट घेऊन समस्या निराकरण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन दिले .यावर सुरुवातीला अनेक मुद्दयांवर चर्चा झाली परंतु उपोषण कर्त्यांनी केलेल्या लिखित मागण्या पैकी मंजूर मागण्या लिखित स्वरूपात देण्याचे सांगितले .त्याप्रमाणे मंजूर मागण्या लिखित स्वरूपात दिल्याने अखेर विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पाटील यांच्या हस्ते डॉक्टर अनिकेत मेस्त्री याना सरबत पाजून उपोषणाची यशस्वी सांगता करण्यात आली .

यावेळी मुरुड आगाराकडून मुरुड-पनवेल बस सेवा कोलेंई पर्यंत लोकल करुन कोर्लईच्याच्या पुढे पनवेल पर्यंत विना थांबा करण्याची मागणी मंजूर करण्यात आली .मुरुड-स्वारगेट (ताम्हिणी मार्गे) बस सेवा दिनांक ३१.०८.२०२६ रोजी पासून चालु करण्यात येईल .एसटी मधील सर्व प्रवासी वर्गाला एसटी थांबा आहे तिथेच उतरवले जाईल ज्यांचे अयोग्य वर्तन असेल त्या वाहक चालकावर कार्यवाही केली जाईल .प्रत्येक बसमध्ये विल, पाना, टॉमी, जॅक उपलब्ध करून देण्यासाठी विभागिय कार्यालयास पत्रव्यवहार करुन सदर बाबतची पुर्तता करण्यात येईल.

आगारातील सर्व बस गाड्यांची नियमित देखभाल होऊन सदर बसेसची दैनंदिन यांत्रिक तपासणी करुनच बस मार्गावर देण्यात येतील .जो पर्यंत वाहतुक नियंत्रक उपलब्ध आहे तो पर्यंत वाहतुक नियंत्रक सदर फोन हाताळतील व वाहतुक नियंत्रक यांची कामगिरी संपल्यानंतर सहाय्यक वाहतूक निरिक्षक यांसकडे सदरचा दुरध्वनी फोन सोपवीण्यात येईल.जेणे करून प्रवासी वर्गास बस कधी येईल हे कळणार आहे .मुरुड आगाराला नवीन बस उपलब्ध होण्यासाठी विभागीय कार्यलयाशी पत्रव्यहार करण्याची मागणी मंजूर करण्यात आली .अलिबाग आगारात सी.एन.जी भरतेवेळी प्रवाश्यांची बसण्याकरीता सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे .विहूर येथे नवीनच महानगर गॅस कंपनी लिमिटेड, गॅस पंप सुरु झाला असून तिथे मुरुड आगारातील बसेसना सि.एन.जी भरुन देण्यात यावा यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

## श्रीवर्धन शहरात प्लास्टिक पिशव्या बंदी कागदावरच; बाजारपेठेत दिली जाते खुलेआम कॅरीबॅग

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरात प्लास्टिक पिशव्यांवरील बंदी कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. श्रीवर्धन बाजारपेठेतील काही व्यापारी प्लास्टिक पिशवी अजिबात ग्राहकांना देत नाहीत. परंतु काही व्यापारी खुलेआम ग्राहकांना प्लास्टिकच्या पिशव्या देत आहेत. १२० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आहे. कारण १२० मायक्रोन पेक्षा पातळ असलेल्या पिशव्या या पर्यावरणासाठी अत्यंत धोकादायक आहेत. पातळ पिशव्यांचे रिसायकलिंग करता येत नसल्यामुळे, या प्लास्टिक पिशव्या अनेक वर्ष कुजून देखील जात नाहीत. या पिशव्या पाण्याबरोबर वाहत जाऊन गटारात किंवा सांडपाण्याच्या ओढ्यामध्ये अडकल्यानंतर त्या ठिकाणी पाणी तुंबण्याचे प्रकार घडतात.

प्रत्येक नागरिकांनी देखील आपली जबाबदारी समजून बाजारात जाताना कापडी पिशवी सोबत घेऊन जाणे आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात



आली होती. त्यानंतर काही दिवस प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद झाला होता. अनेक ठिकाणी कचरा जाळताना त्यासोबत पातळ प्लास्टिकच्या पिशव्या देखील जाळल्या जातात. मात्र प्लॅस्टिक पिशव्या जाळल्यानंतर त्यातून विषारी वायू निघत असल्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीने ते अत्यंत गंभीर आहे.

प्लास्टिक पिशव्यांच्या वापराबद्दल प्रशासनाकडून कठोर भूमिका घेतली जाईल का? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. व्यापाऱ्यांवरती कारवाई करण्याबरोबरच ज्या नागरिकांच्या हातामध्ये कॅरीबॅग दिसेल, त्यांच्यावरही दंडात्मक कारवाई करण्यात यावी जेणेकरून नागरिकांकडून कापडी पिशव्यांचा वापर नियमितपणे सुरू होईल.

## घरेलू कामगार संघाच्या वतीने रोहा पोलीस बांधवांना राखी

**रोहा : प्रतिनिधी**

घरेलू कामगार संघ, संलग्न भारतीय मजदूर संघ, रायगड जिल्हा यांच्या वतीने रोहा पोलीस स्टेशन येथे पोलीस बांधवांना राखी बांधून रक्षाबंधनाचा पवित्र सण उत्साहात साजरा करण्यात आला.

समाजाच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी घरेलू कामगार महिलांनी पोलीस बांधवांना राखी बांधून बंधुभाव, प्रेम आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

या प्रसंगी पोलिस निरीक्षक अभय शेलार, पोलिस उपनिरीक्षक सलमान खतीब पोलिस अधिकारी विनोद गायकवाड, गोपीनिय पोलिस याकुब तडवी, पोलिस सुनील सकपाळ, पोलिस भारतीय मजदूर संघ रायगड सचिव अशोक निकम, घरेलू कामगार संघ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष श्रीमती निर्मला भूतकर, तुषार मोरे, तेजस देशमुख, भारती आंग्रे, राजश्री धीडे आणि घरेलू कामगार संघाच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.



## रायगड जिल्ह्यात १२ सप्टेंबरला राष्ट्रीय लोक अदालत

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग एस. बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये १२ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.या लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घेऊन आपले वाद सामोपचाराने मिटवावेत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबागच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश रेवती कंटे यांनी केले आहे.

त्यावेळी न्यायाधीश रेवती कंटे यांनी ही माहिती दिली. सध्या न्यायालयांमध्ये समझोतापात्र (कंपाउंडेबल) प्रकरणांची संख्या ५८,४९८ इतकी प्रलंबित असून, आगामी १२ सप्टेंबरच्या लोक अदालतीसाठी आतापर्यंत ४,८७९ प्रकरणे ठेवण्यात आली आहेत.मागील लोक अदालतीमीध्ये एकूण प्रलंबित प्रकरणे ५५,२५० होती . लोक अदालतीत ८,६७९ ठेवलेली प्रकरणे . तडजोडीने २०८ प्रकरणे निकाली निघाली . ४,०५९ दाखलपूर्व प्रकरणे



निकाली निघाली.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एन.आय. ॲक्ट कलम १३८ (चेक बाऊन्स), दिवाणी दावे, दिवाणी अपिले, वैवाहिक/कौटुंबिक वाद आणि इतर समझोतापात्र फौजदारी गुन्हे या न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांवर समझोत्याद्वारे तोडगा काढण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींची घरपट्टी व पाणीपट्टी, महावितरणची थकीत वीज बिले, दूरसंचार निगम यांची थकीत बिले व बँक कर्ज वसुली अशा दाखलपूर्व प्रकरणांवर समझोत्याद्वारे तोडगा काढण्यात येणार आहे.

न्यायालयात भरलेली कोर्ट फी नियमानुसार पूर्णपणे परत मिळते. साक्षी-पुरावा, उलटतपासणी आणि दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेतून मुक्ती मिळून वकील खर्चात बचत होते. लोक अदालतीतील निवाड्याविरोधात अपील होत नाही, तसेच या निवाड्याची थेट कोर्टामार्फत अंमलबजावणी करता येते, अशी माहिती न्यायाधीश रेवती कंटे यांनी दिली.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या मार्गदर्शनाखाली या लोक अदालतीचे नियोजन करण्यात आले असून, पक्षकार व नागरिकांनी राष्ट्रीय लोक अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन न्यायाधीश रेवती कंटे यांनी केले आहे.

# नीरज चोप्रा आशियाई स्पर्धेतून बाहेर

## घोट्याच्या दुखापतीमुळे हंगाम संपुष्टात



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सरावादरम्यान घोट्याच्या अस्थिबंधाला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे भारताचा स्टार भालाफेकपटू आणि दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा २०२६ च्या उर्वरित हंगामातून बाहेर पडला आहे.

या दुखापतीमुळे तो आगामी आशियाई क्रीडा स्पर्धा आणि डायमंड लीग फायनलमध्ये सहभागी होऊ शकणार नाही, ज्यामुळे भारताच्या सुवर्णपदकाच्या आशांना मोठा झटका बसला आहे. नीरजने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून स्पर्धेतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. त्याने लिहिले की, दुर्दैवाने सरावादरम्यान माझ्या घोट्याचा अस्थिबंध फाटला. माझ्या डॉक्टर आणि संघाशी चर्चा केल्यानंतर आम्ही हा हंगाम येथेच थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

२८ वर्षीय नीरजने दुखापतीमुळे दीर्घकाळ मैदानाबाहेर राहिल्यानंतर जूनमध्ये दोहा डायमंड लीगमध्ये पुनरागमन केले होते, जिथे त्याने ८५.६९ मीटर थ्रो करत चौथे स्थान मिळवले. त्यानंतर त्याने ग्लासगोमध्ये ८५.८३ मीटर थ्रो करून रौप्य पदक पटकावले आणि लॉझान येथे या हंगामातील आपली सर्वोत्तम कामगिरी नोंदवली.

लॉझानमधील स्पर्धा आशियाई खेळांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात होती, जिथे तो भारतासाठी विजयाचा प्रमुख दावेदार होता, मात्र आता या दुखापतीमुळे त्याची संपूर्ण मोहीम अकाली संपुष्टात आली असून २०२६ मधील त्याचे स्पर्धात्मक सामने आता थांबले आहेत.

# भारतीय महिला हॉकी संघासाठी ५० लाखांचे बक्षीस जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बेल्जियम आणि नेदरलँड्स येथे पार पडलेल्या २०२६ च्या एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक पाचवे स्थान पटकावल्याबद्दल हॉकी इंडियाने भारतीय महिला हॉकी संघाला ५० लाख रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर केले आहे. १९७४ मधील पहिल्या विश्वचषकातील चौथ्या स्थानानंतरची भारताची ही आजवरची सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली आहे.

विश्वचषकाच्या अंतिम टप्प्यातील महत्त्वाच्या सामन्यात भारताने गुरुवारी ॲमस्टेलवीन येथे जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या जर्मनीचा ३-१ असा पराभव केला. कर्णधार सलिमा टेटे यांच्या नेतृत्वाखालील या संघाने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट खेळ करत केवळ एकच सामना गमावला. भारताने चीन, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघांना बरोबरीत रोखले, तर दक्षिण आफ्रिकेवर ६-१ असा दणदणीत विजय मिळवला.

हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप टिर्की यांनी संघाच्या



या यशाला ऐतिहासिक म्हटले असून, ५२ वर्षांनंतर मिळालेले हे पाचवे स्थान खेळाडूंची कठोर मेहनत आणि झुंजार वृत्ती दर्शवत असल्याचे सांगितले. महासचिव भोला नाथ सिंह यांनीही संघाने जगातील सर्वोत्तम संघांविरुद्ध केलेल्या कामगिरीबद्दल देशवासीयांना अभिमान वाटत असल्याचे नमूद केले. हा पुरस्कार आगामी आशियाई खेळांच्या पार्श्वभूमीवर खेळाडूंसाठी मोठी प्रेरणा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# मायकेल वॉनने उडवली पाकिस्तानी संघाची खिल्ली



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये तीन कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील दुसरा कसोटी सामना लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात इंग्लंडने २९० धावा केल्यानंतर पाकिस्तानचा पहिला डाव अवघ्या ११० धावांवर आटोपला. त्यामुळे पाकिस्तानच्या फलंदाजांवर जोरदार टीका केली जात आहे. दरम्यान, इंग्लंडचे माजी कर्णधार मायकेल वॉन यांनी पाकिस्तानच्या फलंदाजी क्रमाची तुलना थेट काऊंटी क्रिकेटमधील दुसऱ्या डिव्हिजनच्या संघासोबत केली आहे.

लॉर्ड्स कसोटीतील पहिल्या डावात फलंदाजी करताना पाकिस्तानच्या फलंदाजांचा सुपरफ्लॉप शो पाहायला मिळाला. पाकिस्तानवर टीका करताना मायकेल वॉन म्हणाले की, इंग्लंडचे गोलंदाज तर दमदार गोलंदाजी करत आहेत, पण पाकिस्तानचा फलंदाजी क्रम सेकंड डिव्हिजन काऊंटी क्रिकेटसारखा का आहे? कोणत्याही पातळीवर हा आंतरराष्ट्रीय कसोटी सामन्यातील फलंदाजीचा क्रम वाटत नाही.

तसेच ते पुढे म्हणाले की, खरं सांगू तर इंग्लंडच्या गोलंदाजांना कुठलंही आव्हान मिळत नाही. बऱ्याच वर्षांनंतर पाकिस्तानचा हा सर्वात सोपा फलंदाजी क्रम आहे. या फलंदाजी क्रमाविरुद्ध गोलंदाजी करणं अगदीच सोपं आहे. सर्व गोलंदाजांना गोलंदाजी करावसं वाटत असेल. कारण त्यांना माहीत आहे की गोलंदाजी करायला आलो की विकेट्स घेण्याची सोपी संधी आहे. हे फलंदाज त्यांचा रेकॉर्ड खराब करू शकणार नाहीत. हे तर असं आहे की सर्व गोलंदाज पुढे येऊन हेच विचारताय की कोणाला विकेट हवी आहे.

# बाबर आझमच्या नावावर नकोसा विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

पाकिस्तानचा स्टार फलंदाज बाबर आझम इंग्लंडविरुद्धच्या लॉर्ड्स कसोटीतून संघात परतला, पण पुनरागमनाच्या सामन्यात त्याला मोठी खेळी करता आली नाही. पहिल्या डावात बाबर अवघ्या आठ धावांवर बाद झाला. त्यामुळे त्याच्या नावावर एक नकोसा विक्रम जमा झाला आहे.

दुखापतीतून सावरल्यानंतर बाबरने लॉर्ड्स कसोटीतून मैदानात पुनरागमन केलं. मात्र फलंदाजी करताना तो फार काळ टिकू शकला नाही. त्याच्या या छोट्या खेळीमुळे २०२३ पासून कसोटीत शतक न करता सर्वाधिक डाव खेळणाऱ्या फलंदाजांच्या यादीत त्याचा समावेश झाला आहे. लॉर्ड्स कसोटीत इंग्लंडने पहिल्या डावात २९० धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानची फलंदाजी पुन्हा एकदा ढासळली. पाकिस्तानचा डाव फक्त ११० धावांवर आटोपला. अजान अवैसने ४६ धावांची खेळी करत थोडाफार प्रतिकार केला. त्याच्याशिवाय पाकिस्तानच्या एकाही फलंदाजाला २० धावांचा टप्पा पार करता आला नाही.

बाबरकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र तो आठ धावा करून माघारी परतला.

# नामिबियाकडून दक्षिण आफ्रिकेचा पराभव

## ब्रेव्हिसची ७५ धावांची झुंज व्यर्थ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आम्ही लिंबूटिंबू नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध करत नामिबियाने तिरंगी मालिकेत बलाढ्य दक्षिण आफ्रिकेवर १८ धावांनी दिमाखदार विजय मिळवला. गेल्या वर्षी एकमेव टी-२० सामन्यात नामिबियाने दक्षिण आफ्रिकेला नमवण्याची किमया केली होती. त्यावेळी तो एका सामन्याचा चमत्कार मानला गेला. मात्र वर्षभरात नामिबियाने सख्ख्या शेजारी आफ्रिकेला पुन्हा चीतपट केले.

आफ्रिकेचा कर्णधार ब्युऑन फॉर्च्युनने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. नामिबियाचा सलामीवीर जॅन फ्रायलिंकने ३८ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह ६० धावांची तडाखेबंद खेळी केली. लोरेन स्टीनकॅम्पने २९ चेंडूत ४१ धावांची खेळी केली. या दोघांनी ८४ धावांची खणखणीत सलामी दिली. ही जोडी फुटल्यानंतर नामिबियाची घसरगुंडी उडाली. दक्षिण




आफ्रिकेतर्फे प्रेरलन सुब्रयानने ३ तर ड्युआन यान्सन आणि ब्युऑन फॉर्च्युन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. नामिबियाने १६३ धावांची मजल मारली.दक्षिण आफ्रिका हे आव्हान सहज पार करेल, असे चित्र होते. मात्र डेवाल्ड ब्रेव्हिसचा अपवाद वगळता आफ्रिकेच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही.

धडाकेबाज फलंदाज ल्युहान डी प्रिटोरियस ९ धावा करून तंबूत परतला. टोनी डी झोरझीही मोठी खेळी करू शकला नाही. कॉनर एस्टरह्यूझनकडून अपेक्षा होत्या, मात्र तो ४ धावा करून माघारी परतला.साथीदार नियमित अंतराने बाद होत असतानाही ब्रेव्हिसने चौकार, षटकारांची लयलूट सुरूच ठेवली. ब्रेव्हिस खेळपट्टीवर असेपर्यंत आफ्रिकेला विजयाची आशा होती. १८व्या षटकात ट्रम्पलमानने ब्रेव्हिसला बाद केले आणि आफ्रिकेच्या विजयाची आशा मावळली. ब्रेव्हिसने ५० चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांसह ७५ धावांची खेळी केली. ड्युआन यान्सनने २५ धावा करत ब्रेव्हिसला साथ देण्याचा प्रयत्न केला. नामिबियातर्फे रुबेन ट्रम्पलमान आणि जेजे स्मिट यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.

नामिबियात आयोजित तिरंगी मालिकेतला हा पहिलाच सामना होता. झिम्बाब्वे या स्पर्धेतला तिसरा संघ आहे. दक्षिण आफ्रिकेने या स्पर्धेसाठी सर्व प्रमुख खेळाडूंना विश्रांती दिली आहे. यामुळे ब्युऑन फॉर्च्युनकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. आशिया चषकाच्या धर्तीवर आफ्रिका चषकासदृश स्पर्धा आयोजित करण्याचा हा प्रयत्न आहे. गेल्या वर्षी आफ्रिकेच्या संघाने नामिबियाविरुद्ध एकमेव सामना खेळला होता. त्या सामन्यात आफ्रिकेला १३४ धावाच करता आल्या होत्या. नामिबियाने चार गडी राखून हे लक्ष्य गाठले होते.

# जो रूटने मोडला रिकी पाँटिंगचा मोठा विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा कसोटी सामना लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूटने आणखी एक मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना रूटने चार, तर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना अवघ्या २४ धावा केल्या. तरीदेखील त्याने ऑस्ट्रेलियाचा दिग्गज फलंदाज रिकी पाँटिंगचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.



कसोटी क्रिकेटच्या इतिहासात मायदेशात सर्वाधिक धावा करण्याच्या रेकॉर्डमध्ये रूटने पाँटिंगला मागे टाकले आहे. रूटच्या नावे इंग्लंडमध्ये फलंदाजी करताना ७५९४ धावा करण्याची नोंद आहे. याआधी हा रेकॉर्ड रिकी पाँटिंगच्या नावावर होता. पाँटिंगने ऑस्ट्रेलियात फलंदाजी करताना ७५७८ धावा केल्या होत्या. तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर करणाऱ्या सचिन तेंडुलकरच्या नावे भारतात फलंदाजी करताना ७२१६ धावा करण्याची नोंद आहे. तसेच श्रीलंकेचा दिग्गज फलंदाज महेला जयवर्धने आणि दक्षिण आफ्रिकेचा स्टार अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिस या यादीत पाचव्या स्थानी आहे.

जो रूटने गेल्या काही वर्षांत अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत, पण गेल्या काही सामन्यांमध्ये त्याला नावाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. पाकिस्तानच्या ताफ्यात अनुभवी गोलंदाज नाहीत, तरीदेखील रूट या गोलंदाजांचा सामना करताना संघर्ष करताना दिसून येतोय. गेल्या तीन डावांत फलंदाजी करताना त्याला अवघ्या ९४ धावा करता आल्या आहेत. या मालिकेसाठी त्याची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यामुळे कर्णधाराने पुढाकार घेऊन धावा करणेही तितकेच गरजेचे आहे.

या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंडचा डाव अवघ्या २९० धावांवर आटोपला. इंग्लंडकडून जेमी स्मिथने सर्वाधिक ६१, तर जॉर्डन कॉक्सने ५५ धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पाकिस्तानचा डाव अवघ्या ११० धावांवर आटोपला. यासह इंग्लंडने पाकिस्तानवर मोठी आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना इंग्लंडने ८१ धावा केल्या असून २५०हून अधिक धावांची आघाडी घेतली आहे.

# 'रेस टू डीपी वर्ल्ड'ची उत्साहात सुरुवात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) आणि 'डीपी वर्ल्ड' यांच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या 'रेस टू डीपी वर्ल्ड इंडिया चॅम्पियनशिप' या हंगामभर चालणाऱ्या स्पर्धेची सुरुवात नुकतीच मोठ्या उत्साहात करण्यात आली.

यावेळी 'डीपी वर्ल्ड'चे व्यवस्थापक हेमंतकुमार रुईया, 'डीपी वर्ल्ड पीजीटीआय'चे अध्यक्ष व माजी क्रिकेटपटू कपिल देव आणि 'डीपी वर्ल्ड पीजीटीआय'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अमनदीप जौहल यांच्या हस्ते 'डीपी वर्ल्ड पीजीटीआय ऑर्डर ऑफ मेरिट'च्या करंडकाचे अनावरण करण्यात आले. या स्पर्धेमुळे देशातील गोल्फ स्पर्धांचे वेळापत्रक नव्याने आखले जाणार असून ते 'डीपी वर्ल्ड टूर'शी सुसंगत केले जाणार आहे.

'रेस'मधील पहिल्या तीन स्पर्धा 'जे अँड के ओपन', 'कोल इंडिया ओपन' आणि




'कोलार ओपन' ह्या ऑगस्टच्या पहिल्या तीन आठवड्यांत पार पडल्या आहेत. ३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबरदरम्यान ग्रेटर नोएडामध्ये होणाऱ्या पहिल्या 'कपिल देव इन्व्हेन्शल टूर चॅम्पिअनशिप'ने 'रेस'चा समारोप होणार आहे.

# तेव्हा माझ्या चेहऱ्यावर हसू होते!

## कर्णधारपदावरून हटवण्यावर सूर्यकुमार यादवने सोडले मौन

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय संघाचा स्टार खेळाडू सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत जेतेपदाचा मान पटकावला होता. पण ही स्पर्धा झाल्यानंतर बीसीसीआयने मोठा निर्णय घेत त्याला टी-२० संघातून आणि कर्णधारपदावरून काढून टाकले. त्यानंतर श्रेयस अय्यरची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली. आयर्लंड दौऱ्यापासून श्रेयस अय्यरने भारतीय टी-२० संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यानंतर भारतीय संघाला लागोपाठ दोन मालिका गमवाव्या लागल्या. आता कर्णधारपदाबाबत सूर्यकुमार यादवने मोठे वक्तव्य केले आहे.

कर्णधारपदावरून काढून टाकल्यानंतर काही महिने उलटल्यानंतर सूर्यकुमार यादवने अखेर मौन सोडले आहे. ज्यावेळी माझं नाव संघातून वगळण्यात आलं, तेव्हा माझ्या चेहऱ्यावर हसू होतं, असं सूर्या म्हणाला. यासह २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचं नेतृत्व करायचं होतं, असंही तो म्हणाला.

भारताचा माजी क्रिकेटपटू आकाश चोप्रासोबत बोलताना सूर्यकुमार यादव म्हणाला, जेव्हा भारतीय संघाच्या यादीत माझं नाव नव्हतं, हे पाहून मला हसू आलं. कारण जेव्हा जेव्हा मी भारतीय संघासाठी खेळत होतो किंवा मग दबावाच्या स्थितीत खेळतो, गोष्टी मनाविरुद्ध होत असतील तेव्हा मी नेहमीच हसलो आहे आणि शांत राहिलो आहे. भूतकाळात मला जेव्हा जेव्हा चांगली कामगिरी करण्याची संधी मिळाली, त्या क्षणाबद्दल मी नेहमीच कृतज्ञ राहिलो आहे.

तसेच तो पुढे म्हणाला की, असं काही होईल मला वाटलंही नव्हतं. २०२६ मध्ये संघात आल्यानंतर मला वाटलं की, मी या संघाला आणखी पुढे घेऊन जाईन. ऑलिम्पिक स्पर्धा येतील, त्यानंतर आणखी एक वर्ल्डकप येईल. पण नेमकं त्याचवेळी आपण काय विचार करतोय आणि समोरचा व्यक्ती काय विचार करतोय, या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

# नागपूरच्या गौरवची १५०० मीटर रेसमध्ये चमकदार कामगिरी

**मुंबई : प्रतिनिधी**

मैदानावर पदक जिंकण्याचे स्वप्न अनेक खेळाडू बाळगतात, पण हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काहींच्या जीवनात मैदानाबाहेरही तितकाच मोठा संघर्ष असतो. दिवसभर नागपुरात डिलिव्हरी बॉय म्हणून काम करणारा आणि सकाळ-संध्याकाळ मैदानावर घाम गाळणारा गौरव खोडतकर त्यापैकीच एक आहे. गौरवचे ध्येय एकच, ते म्हणजे १५०० मीटर शर्यतीत राष्ट्रीय स्तरावर आणि नंतर देशासाठी पदक मिळवायचे. गौरवने नुकतेच वारंगल येथे पार पडलेल्या इंडियन ॲथलेटिक्स सिरीजमध्ये १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत ३ मिनिटे ४७ सेकंदांची वेळ नोंदवत दुसरा क्रमांक (रौप्य पदक) पटकावला आहे.

त्याची ही कामगिरी महाराष्ट्राच्या १५०० मीटर ॲथलेटिक्समधील आजवरची उत्कृष्ट कामगिरी ठरली असून एका नव्या फ्युचर स्टारची चाहूल देणारीही आहे. मात्र गौरवचा इथपर्यंतचा प्रवास अजिबात सोपा



नाही.गौरवचे वडील ट्रक चालक म्हणून काम करतात, तर आई इतरांच्या घरी घरकाम करते. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याची जबाबदारी गौरववरही आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ मैदानावर सात-आठ तास कसून सराव करतानाच तो दुपारी पोर्टर आणि झोमॅटोचा डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसाठी सरावासोबत आहार, फिटनेस आणि पुरेसा आराम अत्यंत महत्त्वाचा असतो. मात्र गौरवच्या आयुष्यात खेळासाठी आवश्यक सुविधांचा अभाव आणि कुटुंबाची आर्थिक गरज, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी आहेत.

त्यामुळे मैदानावर घाम गाळतानाच मैदानाबाहेरही त्याचा संघर्ष सुरू असतो. दरम्यान, गौरवने वयाच्या १८व्या वर्षी ॲथलेटिक्समध्ये पदार्पण केले. त्याआधी तो व्हॉलीबॉल खेळत होता. पोलीस भरतीच्या तयारीसाठी मैदानावर पोहोचलेल्या गौरवमधील ॲथलेटिक्सची गुणवत्ता प्रशिक्षक जितेंद्र घोरडडेकर यांनी अचूक हेरली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या सहा वर्षांत गौरवने १५०० मीटरमध्ये केलेली प्रगती थक्क करणारी आहे. ॲथलेटिक्समध्ये केवळ पदकच नाही, तर खेळाडूने नोंदवलेले टायमिंगही अत्यंत महत्त्वाचे असते. गौरवने नुकतीच नोंदवलेली ३:४७ मिनिटांची वेळ त्याच्या सातत्याने होत असलेल्या प्रगतीचे द्योतक आहे.गेल्या काही वर्षांत १५०० मीटरमधील त्याच्या टायमिंगमध्ये झालेली सुधारणा ॲथलेटिक्स क्षेत्रातील जाणकारांचे लक्ष वेधून घेत आहे.

कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवून कुटुंबाला हातभार लावत मुलाने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले यश पाहून गौरवच्या आईलाही मुलाचा अभिमान आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने गौरवची ही कहाणी केवळ एका धावपटूच्या यशाची नाही, तर स्वप्न मोठे असेल आणि परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येयाकडे धावता येते, याची प्रेरणादायी कहाणी आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com